सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १५१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## लाडकी बहीण योजना १५०० रुपयांवरच न थांबता लवकरच ३ हजार होतील - मुख्यमंत्री

### आमचं पूर्वीसारखे हप्ते घेणारं सरकार नाही; मुख्यमंत्री शिंदेंची ठाकरेंवर सडकून टीका

कोल्हापूर : आमचं हप्ते जमा करणारं सरकार असून पूर्वीसारखं हप्ते घेणारं सरकार नसल्याची खोचक टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे (णवहर्री ढहरलज्ञशीरू) यांच्यावर केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते जमा करण्यात आले आहेत. त्यावर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे सरकारचा दाखला देत सडकून टीका केली. ते कोल्हापुरातील आयोजित मेळाव्यात बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते सरकारकडून महिलांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत. आम्ही एवढ्यावरच थांबणार नाही. ही योजना १५०० रुपयांवरच थांबणार नाही. राज्याची अर्थव्यवस्था मजबूत होईल, तेव्हा १५०० रुपयांचे ३ हजार होतील, कारण आम्ही देणारे आहोत, घेणारे नाहीत. ही देना बँक आहे लेना नाही. ज्यांनी कधी दिलं नाही त्यांना कधी कळणार, काही लोकं टिंगल करतात, वेडे खुळे काहीही म्हणताहेत, पैसे आल्यावर म्हणतात की लवकर पैसे काढा त्यांचं बरोबर आहे, दोन हफ्ते आम्ही महिलांच्या खात्यात टाकले आहेत, पूर्वीसारखं हप्ते घेणारं हे सरकार नाही, अशी सडकून टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.



तसेच कोरोना काळात विरोधकांनी पुणे, मुंबईत काय काय केलंय, जिथं तिथं मिळेल तिथल्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या तोंडाचा घास काढून घेतला. आनंदाचा शिधा योजनेतही विरोधकांनी खोडा घालण्याचा प्रयत्न केला, त्यासाठीही कोर्टात गेले मात्र, त्यांचं अपील कोर्टाने फेटाळून लावलं अन् बहीणींचा विजय झाला. आता त्यांच्या पायाखालची वाळू सरकलीयं. लोकसभेतही खोटं नरेटिव्ह पसवून त्यांनी लोकांची दिशाभूल केली काही लोकांची मते मिळवली पण माणूस एकदाच फसतो, या योजनेत खोडा घातला तर योजना रद्द होईल असं त्यांना वाटलं, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

दरम्यान, जे सोन्याचा चमचा घेऊन जे जन्माला आले आहेत. त्यांना या पैशांचं महत्व कळणार नाही पण गरीबांना माहिती आहे. सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले बाजूला जाऊ द्या, पण जनतेला सोन्याचे दिवस आणण्याचे काम आम्हाला करायचंय, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

## बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात आज हायकोर्टात पार पडली सुनावणी!

### हायकोर्टाने राज्य सरकारला सुनावले खडे बोल

मुंबई : बदलापूरच्या शाळेतील अल्पवयीन चिमुरडींवर करण्यात आलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी आज मुंबई उच्च न्यायालयात (र्चीलरळ क्ळसहर्लेीीं) सुनावणी पार पडली. यावेळेस हायकोर्टाने बदलापूर पोलीस आणि राज्य सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. लोकांनी रस्त्यावर उतरल्यानंतर तुम्हाला जाग येणं हे खेदजनक आहे, असं हायकोर्टाने सुनावलं. तसेच या प्रकरणात गुन्हा लपवल्याप्रकरणी संबंधित शाळेवर कारवाई करणार असल्याची माहिती राज्य सरकारतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली.



उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने यावेळी राज्य सरकारची बाजू मांडणाऱ्या महाअधिवक्ता बीरेंद्र सराफ यांना अनेक प्रश्न विचारले. तपास विशेष पथकाकडे देण्यापूर्वी बदलापूर पोलिसांनी काय केलं? त्याची कागदपत्रं कुठे आहेत? पीडित मुलींचं समुपदेशन केलंत का? असे सवाल न्यायालयाने राज्य सरकारला विचारले. यावर राज्य सरकारच्या वकिलांनी म्हटले की, पहिल्या पीडीत मुलीचं समुपदेशन झालेलं आहे, दुसऱ्या मुलीचं समुपदेशन सुरू आहे.घटना १२ आणि १३ ऑगस्ट रोजी झाली, पालक १६ ऑगस्टला पोलीस ठाण्यात आले. याप्रकरणी काल, २१ ऑगस्ट रोजी एसआयटी स्थापन झाली आहे. संबंधित पोलीस ठाण्यातील दोन अधिकाऱ्यांना निलंबित केलेलं आहे. घटना लपवल्याबद्दल शाळेवर कारवाई करणार, असे महाअधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला सांगितले. यानंतर हायकोर्टाने राज्य सरकारला याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता यावर राज्य सरकार मंगळवारी दुपारी होणाऱ्या सुनावणीत काय बाजू मांडणार, हे पाहावे लागेल.

## महाराष्ट्र बंदच्या हाकेमुळे पुणे विद्यापीठाची पीएचडी प्रवेश परीक्षा पुढे ढकलली!

### नवीन तारीखही केली जाहीर

पुणे : कोलकाता, बदलापूर आणि राज्यात इतर ठिकाणी घडलेल्या महिला आणि अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. याच पार्श्वभूमीवर २४ ऑगस्ट रोजी होणारी पुणे विद्यापीठाची पीएचडी प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत (डर्रींळींळलरळ झर्हीश्रश झींपश णपर्ळींशीींळींू) २४ ऑगस्ट रोजी पीएचडी प्रवेश पूर्व परीक्षा होणार होती. मात्र २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला आहे. प्रसारमाध्यमात त्या संदर्भातील बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यास विलंब अथवा अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

पीएचडी प्रवेश पूर्व परीक्षा २४ ऑगस्ट ऐवजी आता ३१ ऑगस्ट रोजी घेतली जाणार आहे. झएढ परीक्षेचे (झहऊ रवार्ळीीळेप झएढ शुरा) सुधारीत प्रवेशपत्र लवकरच विद्यार्थ्यांना लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच पेट परीक्षेच्या इतर कोणत्याही बाबींमध्ये बदल होणार नसल्याचे शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी सांगितले.

## पंतप्रधान मोदी विमानाने नव्हे तर ट्रेनने जाणार युक्रेनला

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या पोलंड दौऱ्यावर आहेत. पोलंडनंतर आता पंतप्रधान मोदी २३ ऑगस्टला सरळ युक्रेनला जाणार आहेत. मात्र युक्रेनला ते विमानाने नव्हे तर रेल्वेने जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी पोलंडवरून युक्रेनचा दौरा एका स्पेशल रेल्वेने करणार आहेत. ही रेल्वे काही सामान्य नाही. यात लक्झरी सुविधा आणि वर्ल्ड क्लास सर्व्हिससाठी ओळखली जाते. या स्पेशल रेल्वेला ट्रेन फोर्स वन या नावाने ओळखले जाते. विशेष म्हणजे युक्रेनची राजधानी कीवमध्ये ७ तास घालवण्यासाठी पंतप्रधान मोदी २० तासांचा प्रवास ट्रेन फोर्स वनने करणार आहेत.

पंतप्रधान मोदी पोलंडवरून युक्रेनचा प्रवास रात्रीचा करणार आहे. पोलंडवरून युक्रेनची राजधानी कीवचा प्रवास पंतप्रधान नरेंद्र मोदी विशेष ट्रेनने २० तासांत करतील. ते कीवमध्ये ७ सात घालवतील. मात्र त्यासाठी ते २० तासांचा प्रवास करून जाणार आहेत. आता सवाल हा आहे की पंतप्रधान मोदींनी विमानाच्या ऐवजी रेल्वेचा प्रवास का निवडला. याचे सरळ उत्तर आहे ते म्हणजे रशिया-युक्रेन युद्ध. रशियासोबत युद्धामुळे युक्रेनमधील एअरपोर्ट बंद आहेत. युक्रेनचे रस्ते धोकादायक असल्याने सध्याच्या काळात केवळ रेल्वेनेच प्रवास सुरक्षित मानला जात आहे.



पंतप्रधान मोदी कधी जाणार युक्रेनला

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज म्हणजेच २२ ऑगस्टला भारतीय वेळेनुसार संध्याकाळी उशिरा स्पेशल ट्रेनने युक्रेनची राजधानी कीवसाठी रवाना होतील. पंतप्रधान मोदी ७ तास राजधानी कीवमध्ये घालवतील. या दरम्यान, पंतप्रधान मोदी राष्ट्रपती झेलेन्स्की यांची भेट घेतील. या दरम्यान भारत-युक्रेन यांच्यातील महत्त्वाच्या संरक्षणविषयक व्यवहारावर स्वाक्षऱ्या होतील.

मोदींआधी कोणी केलाय हा प्रवास?

पंतप्रधान नरेंद्र मोदी या रेल्वेने प्रवास करणारे एकमेव व्यक्ती नाहीत. पंतप्रधान मोदींच्या आधी जगातील अनेक दिग्गजांनी युक्रेन-रशिया युद्धात या रेल्वेने प्रवास केला आहे. पंतप्रधान मोदींआधी अमेरिकेचे राष्ट्रपती जो बायडेन यांनीही या रेल्वेतून प्रवास केला आहे. २०२२मध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅको, जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्ज आणि इटलीचे तत्कालीन पंतप्रधान मारियो ड्रागी यांनी या स्पेशल रेल्वेने प्रवास केला होता.

## आंध्र प्रदेशात रिॲक्टरच्या स्फोटात १५ जणांचा मृत्यू



मुंबई: आंध्र प्रदेशातील अनकापल्ले येथील फार्मा कंपनीत बुधवारी जोरदार स्फोट झाला. यात १५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर कमीत कमी ४१ जण जखमी झाले आहेत. घटनेनंतर लगेचच जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.मिडिया रिपोर्ट्सनुसार अच्युतपुरम एसईजेड स्थित एका कंपनीत रिॲक्टरचा स्फोट झाला. डॉक्टरांच्या टीम जखमींवर उपचार करत आहेत. जखमींचे नातेवाईकही रुग्णालयात पोहोचले आहेत. अशात सांगितले गेले की या सर्व घटनेनंतर या कुटुंबियांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

दुपारच्या जेवणाच्या वेळेस घडली दुर्घटना नाहीतर

कंपनीत ही दुर्घटना दुपारच्या वेळेस घडली नाहीतर खूप मोठी जिवितहानी झाली असते. कारण दुपारच्या वेळेस जेवणासाठी अनेक कामगार बाहेर गेले होते. त्यावेळेस रिॲक्टरजवळ कमी कर्मचारी होते.

पंतप्रधानांकडून मदतीची घोषणा

पंतप्रधानकार्यालयाकडून एक्स पोस्टमध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रूपये मदतीची घोषणा करण्यात आली आहे. पोस्टमध्ये पंतप्रधान म्हणाले, अनकापल्लीमध्ये झालेल्या फॅक्टरीमध्ये झालेल्या दुर्घटनेतील मृत्यूप्रकरणी दु:खी आहे. आपल्या प्रिय व्यक्ती गमावलेल्यांप्रती संवेदना. जखमींनी लवकरात लवकर बरे व्हावे अशी प्रार्थना करतो.

## मंकी पॉक्सः लक्षणे दिसताच तपासणी करा-डॉ. अभय धानोरकर

छत्रपती संभाजीनगर दि.२२(जिमाका)- मंकी पॉक्स या संसर्गजन्य आजाराचा प्रसार होऊ नये व झाल्यास तात्काळ उपाययोजना कराव्या, असे आरोग्य यंत्रणेने कळविले आहे. मंकी पॉक्सची लक्षणे दिसताच तात्काळ डॉक्टरांना तब्येत दाखवावी व रक्ताची चाचणीही करुन घ्यावी असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.

सध्या जगातील विविध देशात 'मंकी पॉक्स', या विष्णूजन्य आजाराचा संसर्ग वाढत आहे. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मंकी पॉक्स संसर्गाचा वेग व तीव्रता कमी करण्याच्या अनुषंगाने वेळीच प्रतिबंध सर्वेक्षण व नियंत्रणाबाबत उपाययोजना करण्याच्या सुचना आरोग्य विभागाला दिल्या आहेत. त्यानुसार, देशात, राज्यात आणि जिल्ह्यात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या वतीने मंकी पॉक्स या विषाणूजन्य आजाराला आळा घालण्यासाठी प्रतिबंध सर्वेक्षण मोहिम राबविण्यात येत असून या आजाराविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासोबतच विविध उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

मंकी पॉक्स म्हणजे काय ?

मंकी पॉक्स हा आजार आर या डीएनए प्रकारच्या विषाणूमुळे होतो. काही प्रकारचे खारी आणि उंदरांमध्ये हा विषाणू आढळतो. हे प्राणी या विषाणूचे नैसर्गिक स्त्रोत आहेत, साधारणतः अंगावर पुरळ उमटण्यापूर्वी एक ते दोन दिवसांपासून ते त्वचेवरील फोडावरील खपल्या पडेपर्यंत किंवा ते पूर्णपणे मावळेपर्यंत बाधित रुग्ण इतर व्यक्तीसाठी संसर्गजन्य असतो. जर खूप वेळ बाधित व्यक्तिचा संपर्क आला तर श्वसन मार्गातून बाहेर पडणाऱ्या मोठ्या थेंबा वाटे मंकी पॉक्स होऊ शकतो.

लक्षणेः- मागील तीन आठवड्यात मंकी पॉक्स बाधित देशांमध्ये प्रवास करून राज्यात आलेल्या व्यक्तीच्या शरीरावर अचानक पुरळ उठणे आणि सुजलेल्या लसिका ग्रंथी, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, प्रचंड थकवा अशी लक्षणे दिसून येतात.

प्रतिबंधात्मक उपाययोजनाः- मंकी पॉक्स टाळण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. मंकी पॉक्सचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांनी काळजी घेणे. निकट सहवासितांचा शोध घेणे व आढळल्यास त्याची योग्य प्रकारे निगा राखणे. संशयित मंकी पॉक्स रुग्णाचे वेळीच विलागिकरण करणे. रुग्णांच्या कपड्यांची अथवा अंथरुण-पांघरुणाशी अन्य व्यक्तिचा संपर्क येऊ न देणे, हातांची स्वच्छता ठेवणे, आरोग्य संस्थेमध्ये मंकी पॉक्स रुग्णाशी उपचार करताना पीपीई किट्सचा वापर करणे, निकट सहवासीतांमध्ये २१ दिवस पाठपुरावा करावा, रुग्णास ताप आल्यास प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर यांनी केले आहे.

## विधानसभा निवडणुकीत दलित, मुस्लिमांची मते मविआला मिळणार नाहीत : राज ठाकरे

गडचिरोली, २२ ऑगस्ट - लोकसभा निवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना बघून दलित, मुस्लिमांनी महाविकास आघाडीला मतदान केलं नाही, तर नरेंद्र मोदींचा विरोध म्हणून कौल दिला. परंतु विधानसभा निवडणुकीत दोन्ही समाज महाविकास आघाडीला मतदान करणार नाही,असे भाकित महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गडचिरोली येथे वर्तविले.

राज ठाकरे यांनी आज पक्ष निरीक्षक आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी अनौपचारीक चर्चा केली. यावेळी पक्षाचे नेते अमित ठाकरे, प्रवक्ते तथा नवी मुंबईचे अध्यक्ष गजानन काळे, सतनामसिंह गुलाटी, मनसे चित्रपट सेनेचे अध्यक्ष श्रीकांत माने उपस्थित होते.

राज ठाकरे म्हणाले, येत्या विधानसभा निवडणुकीत कुणाला कौल मिळेल, हे आताच सांगता येणार नाही. सध्या विविध पक्षांमध्ये प्रचंड सरमिसळ झाल्याने मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होण्याची शक्यता आहे. परंतु मनसे इतर पक्षातून आलेल्यांना थेट उमेदवारी देणार नाही. आधी आमच्या कार्यकर्त्यांना संधी देऊ. आम्ही विदर्भातील बहुतांश जागा ताकदीने लढू,असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.




## एअर इंडियाच्या विमानाला पुन्हा एकदा बॉम्बची धमकी!

तिरुअनंतपुरम : मुंबईहून केरळला (घशीरश्र) जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात आज बॉम्ब असल्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर केरळच्या तिरुअनंतपुरम विमानतळावर इमर्जन्सी घोषित करण्यात आली.

यासंदर्भातील माहितीनुसार एअर इंडिया फ्लाईटने आज पहाटे ५ वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास १३५ प्रवाशांसह केरळसाठी उड्डाण केले. नियोजित वेळापत्रकानुसार हे विमान सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी केरळच्या तिरुअनंतपुरम विमानतळावर लँड होणार होते. दरम्यान फ्लाइटच्या वैमानिकाने विमानतळाच्या हवाई वाहतूक नियंत्रणाला बॉम्ब असल्याची माहिती दिली होती. यानंतरच तिरुअनंतपुरम विमानतळावर इमर्जन्सी जाहीर करण्यात आली.

बॉम्बच्या धमकीमुळे हे विमान निर्धारित वेळेच्या आधीच विमानतळावर आणण्यात आले. या विमानातील सर्व १३५ प्रवाशांना सुखरूप खाली उतरवून विमान आयसोलेशनमध्ये नेण्यात आले. तेथे विमानाची कसून तपासणी करण्यात आली. दरम्यान, विमानाच्या वैमानिकाला फ्लाईटमध्ये बॉम्ब असल्याची माहिती कशी मिळाली..? यासंदर्भात एअर इंडिया, विमानतळ प्रशासन किंवा एटीसी कडून अधिकृत माहिती मिळू शकली नाही.

## लद्दाखमध्ये बस दरीत कोसळून ६ जणांचा मृत्यू

लेह, २२ ऑगस्ट : लद्दाखची राजधानी असलेल्या लेहमध्ये आज, गुरुवारी बस दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला असून २२ प्रवासी जखमी झाले आहेत. लेहमधील दुर्बुक भागात ही दुर्घटना घडली. अपघाताची माहिती मिळताच मदत पथकाने घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले.

अपघातग्रस्त बसमध्ये २ मुले आणि २३ शालेय कर्मचाऱ्यांसह एकूण २५ प्रवासी होते. शाळेतील आपल्या सहकार्याच्या लग्नात सहभागी होण्यासाठी सर्वजण दुर्बुकला जात होते. एका वळावर बस खोल दरीत कोसळली. जखमींना लष्कर आणि सीएचसी तांगत्से आरोग्य सेवा केंद्रात दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती लेहच्या उपायुक्तांनी दिली.जखमींना लेह येथील जिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी प्रशासनाने ३ हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले आहेत.

## एमपॉक्सचं थैमान! जगावर पुन्हा लॉकडाऊनची तलवार?

नवी दिल्ली :आफ्रिकन देशांमध्ये झपाट्याने पसरत असलेला 'एमपॉक्स' रोग संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय बनला आहे. आफ्रिकन देशांमध्ये झपाट्याने पसरणारा एमपॉक्स रोग हा नवा कोरोना ठरू शकतो आणि त्यामुळे जगभरात आणखी एक लॉकडाऊन होऊ शकतो,अशी चिंता जगभरात व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत एमपॉक्समुळे जगात पुन्हा लॉकडाऊन होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एमपॉक्स या धोकादायक प्रकारामुळे जगभरात भीतीचे वातावरण आहे.

## ब्लॅकबेरीज ने क्रिकेट स्टार रुतुराज गायकवाडसह टेकप्रो कलेक्शनचे अनावरण

पुणे : ब्लॅकबेरीज, भारतातील प्रिमियम मेन्सवेअर ब्रँड, क्रिकेट सनसनाटी रुतुराज गायकवाड यांच्या सहकार्याने टेकप्रो कलेक्शन लॉन्च करून फॅशन इनोव्हेशनला नवीन उंचीवर नेत आहे. टेकप्रो कलेक्शन हा आधुनिक माणसाचा उत्सव साजरा करतो जो लवचिकता, महत्त्वाकांक्षा आणि जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी अथक प्रयत्नांना मूर्त रूप देतो. डायनॅमिक हालचाल आणि अतुलनीय सोईसाठी इंजिनिअर केलेले, या संग्रहामध्ये स्ट्रेचेबिलिटी, रिंकल रेझिस्टन्स आणि स्मार्ट-ड्राय तंत्रज्ञान यासारख्या प्रगत गुणधर्मांचा समावेश आहे. टी-शर्ट आणि खाकीपासून ते शर्ट्स, ट्राउझर्स, ब्लेझर्स आणि सर्व-सीझन जॅकेट्सपर्यंत, टेकप्रो श्रेणी व्यावसायिक आणि वैयक्तिक दोन्ही गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेला बहुमुखी वॉर्डरोब प्रदान करते.

## वाणी कपूर सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया मोहिमेचा चेहरा

पुणे: डिवाइन सॉलिटेयर अग्रगण्य डायमंड सॉलिटेअर ज्वेलरी ब्रँड, ज्याने एका आठवड्यापूर्वी बॉलीवूड अभिनेत्री वाणी कपूरच्या सहकार्याने द सॉलिटेयर फेस्टिवल ऑफ इंडिया च्या ३ऱ्या आवृत्तीचे अनावरण केले, सह-भागीदार ज्वेलर्स स्टोअर्स आणि सकारात्मक प्रतिक्रिया आधीच ग्राहकांकडून प्राप्त झाले आहे. मागील दोन आवृत्त्यांमध्ये उत्सवादरम्यान खरेदी केलेल्या ग्राहकांनी १२५०० हून अधिक भेटवस्तू दिल्या आणि जिंकल्या. यंदाही ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, विशेषत: अर्थसंकल्पानंतर सोन्याचे दर घसरले असून हिरेही स्वस्त झाले आहेत.भारतातील सर्वात मोठे डायमंड सॉलिटेअर प्रमोशन म्हणून ओळखले जाणारे टीएसएफआय, डिव्हाईन सॉलिटेअर्सच्या २००+ भागीदार ज्वेलर्स स्टोअर्स आणि त्यांचे ऑनलाइन प्लॅटफॉर्म संपूर्ण भारतातील १००+ शहरांमध्ये चालू आहे, ज्यामध्ये जगातील सर्वोत्तम हिऱ्यांचे आकर्षक डिझाईन्सचे प्रदर्शन आहे.

## वीवो इंडिया वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवार्ड्स आणत आहे

पुणे: जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त, वीवो , विश्वासार्ह जागतिक स्मार्टफोन ब्रँड, कल्पनाशक्तीची शक्ती साजरी करण्यासाठी, छायाचित्रकारांना त्यांच्या सर्जनशीलतेचा अनुभव देण्यासाठी आणि त्यांच्या स्मार्टफोनमधून त्यांचा अनोखा दृष्टीकोन समोर आणण्यासाठी वीवो इमॅजिन स्मार्टफोन फोटोग्राफी पुरस्कारांची दुसरी आवृत्ती आणत आहे प्रोत्साहन दिले. प्रसिद्ध लेखिका आणि चित्रपट निर्मात्या झोया अख्तर या ज्युरीचे नेतृत्व करणार आहेत, ज्यात छायाचित्रणातील दिग्गज विनीत वोहरा, राकेश पुलपा आणि आमिर वाणी यांचा समावेश आहे.पुरस्कारांमध्ये सहा रोमांचक आणि वैविध्यपूर्ण श्रेणींचा समावेश आहे: निसर्ग आणि वन्यजीव, आर्किटेक्चर, पोर्ट्रेट, नाईट अँड लाइट, मोशन आणि स्ट्रीट फोटोग्राफी. ८ सप्टेंबर रोजी प्रवेश बंद झाल्यामुळे, ज्युरी ३० अंतिम स्पर्धकांची निवड करेल. या अंतिम स्पर्धकांना एका रोमांचक आव्हानाचा सामना करावा लागेल ज्यामध्ये त्यांना अंतिम मूल्यांकनासाठी त्यांचे कार्य सादर करावे लागेल.

## सर्वोत्तम५ जी स्मार्टफोन ब्रँडने मोटो जी४५ ५जीची घोषणा

मुंबई: मोटोरोला या भारताच्या सर्वोत्तम५ जी स्मार्टफोन ब्रँडने आज मोटो जी४५ ५जी लॉन्च घोषणा करण्यात आली. मोटो जी४५ ५जी -सिरीजच्या स्मार्टफोनमध्ये प्रथमच ३ सुंदर पँटोन क्यूरेटेड कलर व्हेरिएंटमध्ये वेगन लेदर फिनिशसह अल्ट्रा-प्रीमियम डिझाइनसह येतो. या स्मार्टफोनमध्ये ५०एमपी क्वाड पिक्सल कॅमेरा आणि १६एमपी सेल्फी कॅमेरा, १२०हर्ट्ज ६.५ डिस्प्ले सोबत गोरिल्ला ग्लासएँ ३ प्रोटेक्शन आणि डॉल्बी एटमॉसएँसह ड्युअल स्टिरिओ स्पीकर आणि स्मार्ट कनेक्ट, मोटो सिक्योर, फॅमिली स्पेस, मोटो अनप्लग्ड यासारख्या भिन्न सॉफ्टवेअर इतर अविश्वसनीय वैशिष्ट्यांसह सेगमेंटमधील सर्वोत्तम ५ जी स्मार्टफोन ठरला आहे.

## क्रॉसओवर युटिलिटी व्हेईकल एमजी विंडसर सियुव्ही

पुणे : जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने, आपल्या एका ताज्या व्हिडिओमध्ये, भारतातील पहिले इंटेलिजेंट क्रॉसओव्हर युटिलिटी व्हेईकल सियुव्ही, एमजी विंडसर - बहुप्रतीक्षित वाहनाच्या 'इन्फिनिटी ग्लास रूफ' बद्दल माहिती दिली आहे. या नवकल्पनामध्ये एक बेस्पोक डिझाइन आहे जे कारच्या प्लश केबिनसह बाहेरील वातावरणाला अखंडपणे जोडते, ज्यामुळे प्रवाशांना विहंगम आणि इमर्सिव्ह ड्रायव्हिंगचा अनुभव घेता येतो.

## आईकू ने ज़ेड९एस मालिका लॉंच केली

पुणे- उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ने पुन्हा एकदा पूर्णपणे लोड केलेल्या आईकू ज़ेड ९एस मालिका लॉन्च करून उद्योगात एक नवीन उदाहरण प्रस्थापित केले आहे, ज्यामध्ये आईकू ज़ेड ९एस प्रो ५जी आणि आईकू ज़ेड ९एस ५जी यांचा समावेश आहे. आईकू ज़ेड ९एस मालिका 'मेगाटास्कर्स' साठी पूर्णपणे लोड केलेली आहे - प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुण व्यावसायिक ज्यांना जलद कनेक्टिव्हिटी आणि अखंड मनोरंजनाची आवश्यकता आहे. आईकू ज़ेड ९एस मालिका त्यांना सहजतेने मल्टीटास्क करण्यास सक्षम करेल, त्यांना त्यांचे व्यस्त जीवन अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करण्यात आणि दिवसभर कनेक्ट राहण्यास मदत करेल.

## फडणवीसांनी 'लाडकी बहीण योजने'वर मोठी बाजी मारली

आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापत असताना, सत्ता टिकवण्यासाठी भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने अनेक उपक्रम आणि योजना सुरू केल्या आहेत. १७ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना औपचारिकपणे सुरू केली, ज्यावर तीन पक्ष विजय मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजना ही भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांची धोरणात्मक वाटचाल आहे. सूत्रांनी सुचवले आहे की आरएसएस आणि फडणवीस यांच्यात अनेक बैठका झाल्या आहेत, ज्यामध्ये फडणवीस यांनी महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि यशाची पुनरावृत्ती करण्याचे उद्दिष्ट आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत मध्य प्रदेशात दिसणार आहे.

## वीवो वी४० मालिका: ज़ाइस इमेजिंगसह तयार पॅकेज

पुणे - वीवो ने अलीकडेच वी४० मालिका भारतात लॉंच केली, वीवो वी४० आणि वी४० प्रो सह स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये एक नवीन बेंचमार्क सेट केला. प्रथमच, विवोने प्रो आणि नॉन-प्रो दोन्ही प्रकारांवर ज़ाइस सोबत भागीदारी केली आहे, ज्यामुळे वी मालिकेत उत्तम कॅमेरा वैशिष्ट्ये आणली आहेत. त्याच्या जबरदस्त अल्ट्रा-स्लिम डिझाइन, शक्तिशाली कामगिरी आणि प्रगत एआयक्षमतांसह, वी४० मालिका स्मार्टफोन मार्केटमध्ये गेमचेंजर आहे. कॅमेरा इनोव्हेशनचा वारसा पुढे चालू ठेवत, वी४० मालिका तिच्या ज़ाइस सह-अभियंता कॅमेरा प्रणालीसह स्मार्टफोन फोटोग्राफीला पुढील स्तरावर घेऊन जाते. वी४० प्रो मध्ये एक बहुमुखी ट्रिपल कॅमेरा सेटअप आहे ज्यामध्ये ५० एमपी ज़ाइस ओआयएसमुख्य कॅमेरा, ५०एमपीअल्ट्रा-वाइड अँगल कॅमेरा आणि ५०एमपी टेलिफोटो पोर्ट्रेट कॅमेरा समाविष्ट आहे. दुसरीकडे, वी४० मध्ये समान ५०एमपी ज़ाइस मुख्य आणि अल्ट्रा वाइड-एंगल कॅमेरे असलेली ड्युअल-कॅमेरा प्रणाली आहे. दोन्ही स्मार्टफोन्स ५०एमपी ज़ाइस ग्रुप सेल्फी कॅमेराने सुसज्ज आहेत, जे उत्तम सेल्फी देतात. ज़ाइस मल्टीफोकल पोर्ट्रेट, फेस्टिव्हल पोर्ट्रेट मोड आणि स्टुडिओ-गुणवत्तेचा आउरा लाइट पोर्ट्रेटसारखी वैशिष्ट्ये एकूण कॅमेरा अनुभव आणखी वाढवतात.

## एसबीआय लाइफ इन्शुरन्सची भागीदारी

पुणे : भारतातील सर्वात विश्वासार्ह जीवन विमा कंपन्यांपैकी एक, एसबीआय लाइफ इन्शुरन्सने २८ ऑगस्ट २०२४ पासून पॅरिसमध्ये सुरू होणाऱ्या पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक खेळांसाठी सुवर्ण प्रायोजक म्हणून पॅरालिम्पिक समिती ऑफ इंडिया सोबत भागीदारी केली आहे.

# भवन सर्कल साठी निधी कमी पडू देणार नाही : अब्दुल सत्तार



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२२, भवन सर्कलच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी दिली.

सिल्लोड तालुक्यातील भवन जि.प. सर्कल मधील विविध गावांमध्ये विकास कामांचे भूमिपूजन तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ अंतर्गत नोंदणीकृत कामगारांना गृहपयोगी वस्तू (भांडे ) चे वितरण ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित गावकऱ्यांशी संवाद साधत असतांना ना. अब्दुल सत्तार बोलत होते.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, संचालक श्रीरंग पा. साळवे, नंदकिशोर सहारे, विश्वासराव दाभाडे, सतीश ताठे, सुधाकर जाधव, नानासाहेब कळम, काकासाहेब कळम,विजय खाजेकर, शिवाजी दाभाडे, आदिंसह विविध गावातील सरपंच, उपसरपंच, लाभार्थी, गावकरी उपस्थित होते.

पुढे बोलत असतांना ना. अब्दुल सत्तार म्हणाले की, तालुक्यातील रस्ते विकासाची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आले आहे. एकही रस्ता विकासापासून वंचित राहणार नाही यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यासोबतच गावागावांत पायाभूत मूलभूत विकासाची कामे करण्यात आली आहे असे स्पष्ट करीत तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा मंत्री अब्दुल सत्तार यांनी मांडला. भवन सर्कल मधील पाणंद रस्ते विकास तसेच पिंपळगाव पेठ येथील सायंबा महाराज देवस्थान येथे विकास कामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल अशी घोषणा ना. अब्दुल सत्तार यांनी केली.

सिल्लोड तालुक्यातील भवन जि.प. सर्कल मधील पिंप्रि , वरुड, पिंपळगाव पेठ, तांडा बाजार, गव्हाली, तळवाडा, कायगाव, जीवरग टाकळी, बोरगाव कासारी, निल्लोड, चिंचखेडा, भवन येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ अंतर्गत नोंदणीकृत कामगारांना गृहपयोगी वस्तू (भांडे ) चे वितरण देखील ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी विविध गावातील सरपंच, उपसरपंच, लाभार्थी, गावकरी उपस्थित होते.

# विलास भुमरे यांच्याकडून संत ज्ञानेश्वर उद्यानाची पाहणी



तभा वृत्तसेवा

पैठण दि २२ :- रेणुकादेवी शरद साखर कारखाण्याचे चेअरमन विलास बाप्पू भुमरे यांनी जगप्रसिद्ध असलेले संत ज्ञानेश्वर उद्यानाची पाहणी करून अधिकाऱ्यांना पर्यटकांसाठी लवकरच उद्यान सुरू करण्याची सूचना दिल्या यावर संगीत कारंजे आणि ईतर दुरुस्तीचे काम पाहता महिन्याभरात उद्यान सुरू करू असे यावेळी पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी दिपक डोंगरे म्हणाले.शाखा अभियंता तुषार विसपुते,राज्य दूध महासंघाचे नंदलाल काळे,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया,नगरसेवक भूषण कावसणकर, प्रा. संतोष गव्हाणे,बाळू पठाडे यावेळी उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकांसाठी सुरू व्हावे यासाठी चेअरमन विलास बाप्पू भुमरे यांनी गार्डनला भेट देऊन अधिकाऱ्यांशी चर्चा करत उद्यान सुरू होण्याबाबत समस्या जाणून घेतल्या. तसेच आवश्यक उपाय योजना राबवून उद्यान लवकरच सुरू करा अश्या सूचना केल्या याप्रसंगी स्वीय सहाय्यक नामदेव खराद,मार्टिन दास, संजय भंडारे, पटेल,सरपंच आबा गिरगे, माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, सोमनाथ परदेशी,राजेश माणधने,संजय कस्तुरे, अजय पोरवाल, सुनील१ हिंगे,जनार्धन मिटकर सह उद्यान कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

येत्या पंधरा दिवसांत संगीत करंज्याचे प्रात्यक्षिक घेऊन महिन्या भरात उद्यान सुरू होणार असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले.

# सांध्यांच्या व्याधींवरती लहान चिरा करून उपचार आता छ.संभाजीनगर मध्ये उपलब्ध



छत्रपती संभाजीनगर - डॉ. किशोर मुंडे, ,एमबीबीएस , एमएस ऑर्थो ,डीएनबी ऑर्थो, कंसल्टेंट जॉइंट रिप्लेसमेंट आर्थ्रो स्कोपी आणि कॉम्प्लेक्स ट्रामा मेडिकव्हर हॉस्पिटल ,सांगतात आर्थ्रोस्कोपी म्हणजे कमीत कमी चीरा देउन केली जाणारी शस्त्रक्रिया आहे. ज्यात सांध्याचे विविध निदान आणि उपचार करण्यासाठी लहान कॅमेरा (आर्थ्रो स्कोप) वापरला जातो.पारंपारिक खुल्या शस्त्रक्रियेपेक्षा त्याच्या फायद्यांमुळे आर्थ्रोस्कोपी ऑर्थो पेडिक शस्त्रक्रियेमध्ये सामान्यतः केली जाणारी प्रक्रिया बनली आहे. हे लहान चीरे, आजूबाजूच्या ऊतींना होणारा कमी आघात, लवकर ठीक होण्यासाठी आणि संभाव्यतः कमीत कमी पोस्टऑपरेटिव्ह वेदना होण्यासाठी उपयुक्त असून या व्याधीवर आता उपचार छ.संभाजीनगर मध्ये उपलब्ध झाले आहेत.

डॉ. किशोर मुंडे, मेडिकव्हर हॉस्पिटल म्हणतात आर्थ्रो स्कोपीने सांध्यांमधील लिगामेंट्स, गादी, कूर्चाचे नुकसान, सायनोव्हायटिस , परत परत खांद्याचा सांधा निखळणे आणि बऱ्याच सांध्यांच्या व्याधींवरती उपचार केला जाऊ शकतोप्रामुख्याने आर्थ्रो स्कोपी ही गुडघ्यांमधील एसीएल, पीसीएल या लिगामेंटच्या दुरुस्ती साठी तसेच गुडघ्यांमधील गादयांना लागलेला मार बरा करण्यासाठी वापरली जाते. तसेच खांद्यांमधील रोटेटर कफ दुरुस्ती आणि परत परत खांद्याचा सांधा निखळणे यासाठी वापरली जाते. त्यासोबतच कूर्चा दुरुस्ती मायक्रोफ्रॅक्चर, ड्रिलिंग पद्धतीने करण्यासाठी व सायनोव्हियल टिश्यूला काढण्यासाठी केली जाते.

गुडघ्याची आर्थ्रो स्कोपी खुल्या गुडघ्याच्या शस्त्रक्रियेसारखीच नाही, गुडघ्याची आर्थ्रोस्कोपी कमी त्रासदायक असते आणि खुल्या गुडघ्याच्या शस्त्रक्रियेच्या तुलनेत लहान चीरे असतात. यामुळे अनेकदा जलद रिहॅबिलिटेशन होते.

प्रक्रियेदरम्यान, सर्जन गुडघ्याच्या सांध्यामध्ये आर्थ्रो स्कोप एका लहान चीराद्वारे टाकतो आणि सांध्यांच्या आतील भागाचे निरीक्षण करतो.

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ सोयगाव शहरात महाविकास आघाडीचा मुकमोर्चा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ ऑगस्ट

बदलापूर येथील घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी सकाळी दहा वाजता महाविकास आघाडीच्या वतीने शहरातून मूक मोर्चा काढून शासनाचा व त्या दुर्दैवी घटनेचा निषेध केला.यावेळी ज्योतीताई काळे यांनी मुकमोर्चा समारोपच्या मार्गदर्शनात सांगितले सरकारने लाडक्या बहिणींना दिलेल्या त्या पंधराशे रुपयांची किंमत काय असा सवाल थेट राज्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना करून लाडक्या बहिणींच्या मुली जर सुरक्षित नसतील तर त्या पंधराशे रुपयात काय जहर आणून खायचे काय असा प्रश्न मोर्चा च्या माध्यमातून शासनाला उपस्थित केला.

शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरू झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या मूक मोर्चा व्यापारी गल्ली,नारळीबाग भागातून छत्रपती शिवाजी महाराज चौकात आला.याठिकाणी समारोपाच्या प्रसंगी ज्योतीताई काळे यांनी मुलींच्या आई वडिलांना ही उपदेश देत मोबाईल चे एक बटन सुद्धा घातक ठरते त्यासाठी आई वडिलांनिही लक्ष द्यावे.बदलापूरच्या त्या अमानुष घटनेचा निषेध करून महिलांच्या अत्याचाराचा तपास करणारच नाही असे सरकारने एकदाचे जाहीर करून टाका अन्यथा महिलांना सुरक्षा द्या लाडक्या बहिणीपेक्षा सुरक्षित बहिणीची गरज भासू लागली आहे असे ही त्यांनी सांगितले.

यावेळी महाविकास आघाडीचे विठ्ठल बदर पाटील,शिवसेना तालुका प्रमुख (उद्धव ठाकरे गट) दिलीप मचे,राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) शहराध्यक्ष रवींद्र काळे,राष्ट्रवादी काँग्रेस सोयगाव तालुकाध्यक्ष डॉ. इंद्रजित सोळुंके,तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेंद्र काळे,रघुनाथ चव्हाण,शहराध्यक्ष दिनेश हजारी,रवींद्र काटोले,भरत पगारे,कृष्णा जुनघरे पाटील,सुधाकर सोहनी,अरुण सोहनी,अजय नेरपगारे,श्रीकांत बोरसे,अंकुश पगारे,बबन रोकडे,गुलाबराव कोलते पाटील,विजय काळे,ज्योती स्वामी,निर्मला बोराडे,भारती पाटील,स्वामी देशमुख,कमलाबाई पगारे आदींसह महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी, शिक्षक,प्राचार्य आदींची मुकमोर्चा मध्ये उपस्थिती होती.यावेळी महाविकास आघाडी च्या वतीने ज्योतीताई काळे, कमलाबाई पगारे,विठ्ठल बदर पाटील,रवींद्र काळे,राजेंद्र काळे,दिनेश हजारी,अंकुश पगारे,यांनी तालुका प्रशासनाला निषेधाचे निवेदन दिले आहे.

## जायकवाडी धरण ३३ टक्क्यांवर पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न मिटला

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- जायकवाडी धरणाच्या पाण्यावर मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांतील शेतीसह पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. सध्या जायकवाडी धरणातील साठा ३३.१० टक्क्यांवर आला आहे. एकूणच सध्या तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असून, खरीप हंगामातील पिकांना पाणी देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सध्या जायकवाडी धरणात ४ हजार २८८ क्युसेकने पाण्याची आवक सुरू आहे. दोन दिवसांत थोडीफार आवक वाढल्याने धरणाच्या पाणीसाठ्यात हळूहळू वाढ होत आहे. जलसाठा आता ३३ टक्क्यांवर गेला असल्याने शेती सिंचनाला पाणी देणे शक्य होणार आहे. धरणाच्या पाण्यावर मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांतील १ लाख ८३ हजार ३२२ हेक्टर शेती ओलिताखाली येते. सध्या वरील भागात पाऊस सुरू असल्याने आवक वाढली आहे. आजघडीला जायकवाडीचा पाणीसाठा ३३ टक्क्यांवर असून, यात आणखी वाढ होणार असल्याने आवर्तने देणे शक्य होणार आहे, अशी माहिती अभियंत्यांनी दिली.

**आवक सुरूच**

जायकवाडीच्या धरणावर डावा व उजवा असे दोन कालवे असून, डावा कालवा हा २०८ कि. मी. लांबीचा आहे. याची वहनक्षमता १००.०८ घमी प्रतिसेकंद आहे. यावर संभाजीनगरसह जालना, परभणी जिल्ह्यातील १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर शेती ओलिताखाली येते. सलगच्या दुष्काळाने मराठवाडा पाण्याविना कोरडा पडला होता. जायकवाडी धरणात वरच्या धरणांतून पाण्याची आवक चांगली सुरू असून, मराठवाड्यातील शेती सिंचनाला पाणी मिळेल याचे नियोजन आतापासून करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## चिंचोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे तिन भारत टॅलेंट सर्च परिक्षेत विद्यार्थी चमकले - वर्गशिक्षिकेचा सत्कार



तभा वृत्तसेवा बिडकीन दि २१ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन केंद्रातील चिंचोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तिन विद्यार्थ्यांनी भारत टॅलेंट सर्च (बि.टी.एस.) परिक्षेत राज्य पातळीवर नेत्रदीपक यश मिळविले आसुन तेरा विद्यार्थी पात्र ठरले आहेत.चिंचोली जिल्हा परिषद शाळेचे इयत्ता सातवीचे विद्यार्थी भारत टॅलेंट सर्च या परीक्षेत बसले होते त्यात किरण दीपक गाडेकर या विद्यार्थ्याने राज्यस्तरावर तिसरा क्रमांक मिळविला तर दिपक नवनाथ काळे , अंजली दिलीप कळसकर या विद्यार्थ्यांनी पैठण तालुकास्तरावर अनुक्रमे प्रथम , द्वितीय , तृतीय पटकाविला तर याच शाळेतील १३ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.वर्गशिक्षिका संगीता भन्साली यांनी अथक परिश्रम घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यश मिळवून दिल्याबद्दल सरपंच अमोल कळसकर , शालेय समिती अध्यक्ष दत्तात्रय कळसकर , मुख्याध्यापक सुनिल वारे यांच्या हस्ते संगीता भन्साळी यांचा १५ ऑगस्ट रोजी सत्कार केला . दरम्यान उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कल्याण कळसकर, बबन कळसकर, गणेश राठोड ,विष्णू कळसकर ,संतोष कळसकर, कृष्णा कळसकर, दिलीप कळसकर , नवनाथ काळे ,उत्तम कळसकर , दीपक गाडेकर , आत्माराम कळसकर ,विलास कळसकर ,बाळासाहेब कळसकर , अण्णासाहेब कळसकर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद खाबीया तर शुभांगी वारके यांनी आभार प्रदर्शन केले.

## पत्रकार संघाचे वतीने बदलापूर महिला पत्रकार न्याय मिळावा याप्रकरणी पोलीस निरीक्षकांना निवेदन

बिडकीन दि २२ ऑगस्ट - बदलापूर येथे वार्तांकन करणाऱ्या महिला पत्रकाराला अपशब्द वापरणाऱ्या वामन म्हात्रेवर बदलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन तात्काळ अटक करण्यात यावी.व महिला पत्रकार यांना न्याय मिळावा यासाठी बिडकीन पत्रकार संघ यांच्या वतीने आज दि २२ ऑगस्ट गुरुवार रोजी पोलीस ठाणे बिडकीन येथे निवेदन देण्यात आले.यावेळी निवेदनात नमुद करण्यात आले होते कि,बदलापूर येथे मंगळवारी दिनांक २० ऑगस्ट रोजी सदर घटनेचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या महिला पत्रकाराला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी महिला पत्रकार मोहिनी जाधव यांना अपशब्द वापरले की बदलापूर येथील घडलेल्या अत्याचारांच्या घटनेला सर्वस्वी पत्रकारच कारणीभूत आहेत. पत्रकार आग लावण्याचे काम करत आहेत. तसेच तु आशा बातम्या देत आहेस की जणू काही अत्याचार आपल्यावरच झाला आहे.. असे म्हणून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वक्तव्य केले. या बाबत महिला पत्रकार यांनी बदलापूर पोलीस ठाण्यात मध्ये म्हात्रे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली असुन पोलीसांनी तक्रार दाखल करुन घेतली आहे. तरी यातील माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यास तातडीने अटक करण्यात यावी अशी मागणी बिडकीन पत्रकार संघाचे वतीने करण्यात येत आहे अशा शब्दांत लिखित स्वरूपात पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, पोलीस ठाणे बिडकीन यांना निवेदन देण्यात आले.याप्रसंगी नंदकुमार वैदय, अरुण देविदास ,हसन चाऊस, दिलीप जोशी, अली ईनामदार,अलिम शेख,रविंद्र गायकवाड,सुनिल बदर,विजय शेजूळ,सऊद हबीब,किरण औटी,फेरोज मिर्झा,महेश वैद्य आदींनी बिडकीन पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांना निवेदन देण्यात आले.

## ओला इलेक्ट्रिकने इलेक्ट्रिक मोटरसायकली केल्या लॉन्च

छत्रपती संभाजीनगर : भारताला जागतिक ईव्ही आणि नवीन ऊर्जा हब बनवण्याच्या आपल्या संकल्पाची पुष्टी करत, ओला इलेक्ट्रिकने आज नवीन उत्पादने आणि भविष्यातील रोडमॅप ईव्ही आणि एनर्जी व्हर्टिकलमध्ये जाहीर केले. रोडस्टर, रोडस्टर एक्स आणि रोडस्टर प्रो लाँच करून, कंपनीने आज इलेक्ट्रिक मोटरसायकल सेगमेंटमध्ये प्रवेश केला अनुक्रमे रुपये ७४,९९९, रुपये १,०४,९९९ आणि रुपये १,९९,९९९ पासून सुरू तसेच स्पोर्टस्टर आणि रोहेड या दोन नवीन मोटारसायकलींना बाजारात आणणार आणि पुढे वित्त वर्ष २६ ची पहिली तिमाही पासून स्वतःच्या वाहनांमध्ये सेलचे एकत्रीकरण जाहीर केले. कंपनीने स्वदेशी विकसित भारत ४६८० सेल आणि बॅटरी पॅक, नवीन जेन- ३ प्लॅटफॉर्म आणि मूवओएस ५ संकल्प २०२४ तामिळनाडूच्या कृष्णागिरी येथील फ्यूचर फॅक्टरी येथे ओलाचा वार्षिक लॉन्च कार्यक्रम संपन्न झाला.

## कैलास दांडगे यांचे निधन



सोयगाव,दि.२२ ऑगस्ट : सिल्लोड तालुक्यातील अंभई येथील रहिवासी कैलास संपत दांडगे(वय.४६) यांचे बुधवार रोजी रात्री ११.००वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार रोजी अंभई ता.सिल्लोड येथे सकाळी ११:०० वा.येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,चार मुली, चार भाऊ,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.ते गजानन दांडगे (पोलीस) यांचे काका होत.

## शेख हाजी अब्दुल जब्बार यांचे निधन

सिल्लोड : प्रतिनिधी (दि.२२) -- शहरातील जामा मस्जिद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ राहणारे शेख हाजी अब्दुल जब्बार वय ८५ वर्ष यांचे दीर्घ आजाराने (दि.२२) गुरुवार रोजी सकाळी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा दोन मुली सून जावई नातवंडे असा परिवार आहे. मयत शेख हाजी अब्दुल जब्बार हे राज्याचे अल्पसंख्याक व पणन मंत्री तथा पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे काका होत. मयाताची नमाजे जनाजा फतेह ईस्लाम मध्ये बाद असर अदा करण्यात आली व त्यांचा दफन विधी दिल्ली रोडवरील फकीरी या कब्रस्तान मध्ये दफनविधी करण्यात आला.


CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी बंद करण्यास विरोध : मधुकरराव चव्हाण



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ ऑगस्ट -**

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय बंद करण्यास आमचा विरोध असेल, अशी माहिती माजी मंत्री माजी आमदार मधुकर चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेवुन दिली.

यावेळी पुढे बोलताना म्हणाले कि श्री तुळजाभवानी तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय बंद करुन कौशल्य विकास विद्यापीठ काढण्याच्या घाट घातला जातो याला पैसा कुठुन येणार असा सवाल यावेळी केला.

रेल्वेमार्गासाठी जमिनी संपादनात शेतकऱ्यांची रोजीरोटी हिरावली जात असताना त्यांच्या जमिनी कवडी मोल दरात कारवाई खाक्या दाखवुन ताब्यात आहेत आमच्या काळात आम्ही बाधीतांना समाधानकारक मावेजा देत होतो. यांच्या जमिनीना समाधानकारक भाव, द्या त्यांच्यावर अन्याय कराल तर आम्ही पक्ष शांत बसणार नाही असा इशारा दिला.

यावेळी मुकुंद डोंगरे, रुषी मगर, सुनिल रोचकरी, शिवाजी गायकवाड, अमर चोपदार, तौफीक शेख, धनंजय मगर, अँड. राम ढवळे, शरद जगदाळे उपस्थितीत होते.

### संक्षिप्त वृत्त...



### भाविकाकडून श्री तुळजाभवानी मातेस ९०० ग्रॅम वजनाचे चांदीचे बिस्कीट अर्पण

**तुळजापूर, दि.२२ ऑगस्ट -**

सांगली जिल्हातील विटा तालुक्यातील खानापूर येथील राजकुमार विजय सिंग हजारे या भाविकाने मंगळवार दि.२० रोजी तिर्थक्षेत्र तुळजापूरला येवुन श्री तुळजाभवानी मातेस १००४. ९०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दोन बिस्कीट अर्पण केले. यावेळी मंदीर संस्थानतर्फ त्यांना देविचे प्रतिमा, महावस्त्र देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांचे पुजारी मयुर शिंदे उपस्थितीत होते.



### जयप्रकाश विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**धाराशिव, दि.२२ ऑगस्ट -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे विद्यार्थ्यात सामुदायिक रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे होते. विद्यालयातील मुलींनी सर्व मुलांना राख्या बांधल्या. याप्रसंगी रामदास कोळगे राजनारायण कोळगे, बालाजी कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सचिन कांबळे यांनी मानले.

### धाराशिवचे सुपुत्र सुरेंद्र माळाळे सोलापूरचे सहाय्यक पोलीस आयुक्त

**धाराशिव, दि.२२ ऑगस्ट -**



धाराशिवचे सुपुत्र, पुणे येथील सहकार नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे यांची सोलापूर येथील पोलीस आयुक्तालयात सहायक पोलीस आयुक्तपदी पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्याचे सुपूत्र सुरेंद्र गजेंद्र माळाळे हे सहकार नगर, पुणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पहिल्याच परिक्षेत ते पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवडले गेले. सुरेंद्र माळाळे यांना आतापर्यंत महाराष्ट्र शासनाचे स्वातंत्र्याचे ५० वर्षे पदक, खडतर सेवा पदक, अंतर्गत सुरक्षा पदक, डी.जी इन्सिगनिया अवॉर्ड, स्वातंत्र्याची ७५ वर्षे पदक, उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून पोलीस महासंचालकांचे प्रशस्तीपत्र, नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोकडून उत्कृष्ट कार्याचे प्रशस्तीपत्र, २०२२ चे राष्ट्रपती पदक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

### रुपामाता मल्टीस्टेट नळदुर्ग शाखेस उत्कृष्ट कार्याबद्दल पारीतोषिक

**नळदुर्ग, दि.२२ ऑगस्ट -**

रुपामाता परीवारात रुपामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी धाराशिव अंतर्गत असलेल्या बँकींग क्षेत्रातील शाखात सन २०२३/२४ या वर्षासाठी बँकींग क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाखांचा गौरव दि.१८ ऑगस्ट रोजी करण्यात आला. रुपामाता परीवारातील नळदुर्ग शाखेस गेल्या वर्षी आर्थिक श्रवर्षात केलेल्या व्यवसायातुन ६७ लाख रुपयांचा नफा झाला आहे. शाखेकडे १३ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी आसुन नळदुर्ग शाखेने १७ कोटी ५२ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले. तसेच सोने तारण साठी ४ कोटी ५० लाख कर्ज वाटप केले आहे. याबद्दल नळदुर्ग शाखेस व्दितिय कृमांकाचे पारीतोषिक व प्रमाणपत्र देवुन गौरवण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक चेअरमन अँड. व्यंकट गुंड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन संस्थेचे संचालक सुधाकर गुंड गुरुजी, बाबुराव पुजारी, अजित गुंड मल्टीस्टेटचे मुख्यकार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, अर्बन विभाग मुख्यकार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले, जनरल मॅनेजर विजयकुमार खडके, पालक अधिकारी कास्ते अवधुत उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नळदुर्ग शाखाधिकारी गणेश पाटील, रघुवीर तिवारी, अनिता आवटे, पार्थ कुलकर्णी, योगिता माळी व मिलिंद भुमकर यांना पारीतोषक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

### छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**अभिषेक देविदास हळदे,** या नावाची **इयत्ता १२ वी पासची टी.सी.** व इतर शैक्षणिक कागदपत्रे असलेली फाईल धनगरवाडी ते सोलापूर प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क : ९६५७५४२५५०**

फाशी द्या, फाशी द्या... बलात्काऱ्यांना फाशी द्या... बालिकांना न्याय द्या...

# बदलापूर, कोलकाता अत्याचार प्रकरणी सकल धाराशिवकरांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा







### न्यायाच्या मागणीसाठी विद्यार्थिनींचा आक्रोश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑगस्ट -**

महाराष्ट्राला काळीमा फासणाऱ्या महिला, मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना राज्य सरकार या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत असल्याच्या निषेधार्थ सकल धाराशिवकरांच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. फाशी द्या फाशी द्या.. बलात्काऱ्यांना फाशी द्या.. बालिकांना न्याय द्या.. आम्हाला न्याय हवाय.. गगनभेदी घोषणा देऊन विद्यार्थिनींनी न्यायाच्या मागणीसाठी आक्रोश व्यक्त केला.

बदलापूर येथे लहान मुलींवर शाळेमध्ये झालेला लैंगिक अत्याचार, कोलकाता येथील महिला डॉक्टरवर अत्याचार करुन खून आणि छत्रपती संभाजीनगर येथे तरुणीची झालेली हत्या तसेच उरण, चाकूर, तुळजापूर व महाराष्ट्रात आणि देशात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनेतील नराधमांना जलगदती न्यायालयात प्रकरण चालवून तात्काळ फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी सकल धाराशिवकर रस्त्यावर उतरले. छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर मोर्चा काढून घटनांचा निषेध करण्यात आला. या घटना महाराष्ट्राच्या आणि देशाच्या संस्कृतीला काळीमा फासणाऱ्या आहेत. असे दुष्कृत्य करणाऱ्या नराधमांना जगण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे अशा नराधमांविरुद्ध अतिजलद न्यायालयात चालवून फाशीची शिक्षा द्यावी आणि मयत व पीडित महिला व बालिकांना न्याय द्यावा. ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी नराधमांना फाशीची शिक्षा न झाल्यास शासनाच्या लाडक्या बहिणी मयत बहिणींना न्याय मिळवून देण्यासाठी अन्न-पाणी त्याग उपोषण करतील, असे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आले.

आंदोलनात सकल धाराशिवकर, उबाठा महिला आघाडीच्या श्यामल वडणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील, राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष सक्षणा सलगर, मसूद शेख, श्वेता दुरुगकर, मोना भोसले, आनंदी पाटील, आदित्य पाटील, धीरज घुटे, प्रशांत पाटील, विनोद वीर, अग्निवेश शिंदे, सकल मराठा समाजचे बलराज रणदिवे, निखिल जगताप, तेजस बोबडे, जयवंत ओमणे, सुरज लोंढे, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे जिल्हाध्यक्ष गौरव बागल, आकाश कोकाटे, मंगेश निंबाळकर, आकाश भोसले, श्योगेश आतकरे, अमोल सिरसट, दत्तात्रय जावळे, हनुमंत तांबे, गुंडोपंत जोशी अॅड. संजय शिंदे, भैरवनाथ रणखांब, अविनाश रणखांब, अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, अमोल गोरे, शिवहरी भोसले, धनंजय दुधभाते, आशा देशपांडे, डॉ. इंदु राठोड, अॅड. अॅड. ज्योती बडेकर, अॅड. भाग्यश्री कदम, अॅड. सारिका पाटील, अॅड. प्रियांका शहाणे, अॅड. प्रणिता मुळे, यांच्यासह विविध पक्ष, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी तसेच धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी हायस्कुल, अभिनव इंग्लिश स्कूलसह विविध शाळांमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

#### आम्ही कायद्याची वाट बघणार नाही : सलगर

भारत देश संविधानावर चालतो, परंतु ही परिस्थिती बदलली आहे. आम्हाला सरकारची १५०० रुपयांची अगरबत्ती नकोय, आम्हाला स्वाभिमानाने जगणारी महिला, युवती बालिका हवीय. म्हणून महाराष्ट्रात अशी घटना घडली तर आम्ही कुठल्याही कायद्याची वाट बघणार नाही. रस्त्यावर पळवून नराधमांना आम्ही नराधमांना शिक्षा देऊ, असा इशारा राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष सक्षणाताई सलगर यांनी यावेळी दिला.

#### नराधमांना फाशीच झाली पाहिजे : वडणे

या सरकारला सत्तेवरुन खाली खेचण्याची गरज आहे. ज्यांच्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडली त्यांना कायद्याचा धाक राहिलेला नाही. त्यामुळे नराधम असे कृत्य करत आहेत. अशा नराधमांना फाशीचीच शिक्षा व्हायला हवी.

या राज्याच्या गृहमंत्र्यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी श्यामलताई वडणे यांनी यावेळी केली.

## अहिल्यादेवी होळकरांचे सामाजिक काम प्रेरणादायी : स्नेहल पाठक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑगस्ट -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले सामाजिक काम, त्यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. तसेच पाणीपुरवठ्यासाठी अनेक शाश्वत तलाव आणि बारव बांधून आपल्यासमोर एक आदर्श उभा केला आहे, असे प्रतिपादन संस्कार भारतीच्या प्रांताध्यक्षा आणि सावरकर साहित्य संमेलन हम्पीच्या अध्यक्षा स्नेहल पाठक यांनी केले. त्या आज आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी निमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्रशालेचे मुख्याध्यापक डॉ. मनिष देशपांडे उपस्थित होते. यावेळी बोलताना पाठक पुढे म्हणाले की, कुशल प्रशासक आणि प्रजा हितदक्ष अहिल्यादेवी होळकरांचे कार्य त्यांच्या त्रिजन्मशताब्दी निमित्त सर्वांसमोर यावे या उद्देशाने हे व्याख्यान आयोजित केले आहे.

या माध्यमातून अहिल्यादेवी होळकरांचे शौर्य आणि सामाजिक बांधिलकी ही सर्वांसमोर यावे त्यातून प्रेरणा घेऊन सामाजिक कामाची बांधिलकी वाढावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## आरोग्य दूत डॉ. राहुल घुले यांचा पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२२ ऑगस्ट -**

भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघातील डॉ. राहुल घुले यांनी दि.२२ रोजी धाराशीवचे पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्याशी शिवसेनेचे प्रवेश केला. पुणे येथे सावंत यांच्या कार्यालयात डॉ. राहुल घुले व त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांचा शिवसेना शिंदे गटात शिवबंधन बांधून प्रवेश केला.

डॉ. राहुल घुले यांनी गेल्या एक वर्षापासून भूम परंडा वाशी मतदारसंघात आरोग्य विभागात मोफत शस्त्रक्रिया करुन व आरोग्य शिबीर घेऊन वेगळे वलय निर्माण केले आहे. डॉ. घुले यांच्यामार्फत आजतागायत मोफत आरोग्य तपासणी शिबिर, मोफत ऑपरेशन खतना शिबीर, शेतकऱ्यांसाठी मोफत डीपी वाहतूक, लग्न समारंभासाठी मोफत भांडे व साहित्य देण्याचे उपक्रम त्यांनी राबवले आहेत. डॉ. घुले यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना मोठी ताकद मिळणार आहे.



डॉ. राहुल घुले यांच्यासमवेतत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे भाऊसाहेब मुंडे, श्रवण बोंदार्डे, सचिन जाधवर, श्रीकांत कुटे, बालाजी कुटे, मैनुदिन शेख, मिनाक्षी काळे, मुसाभाई शेख व इतर यांच्यासह परंडा मतदार संघातील विविध गावातील आरोग्यमित्रांनी जाहीर प्रवेश केला.

## शिक्षणाधिकारी यांच्या भेटीनंतर सीईओंची नाथवाडी जि.प. शाळेला भेट

### गुणवत्ता, शाळेचा परिसर पाहुन शिक्षिकांचे कौतुक...

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ ऑगस्ट -**

शालेय गुणवत्ता विकास अभियान कार्यक्रमा अंतर्गत येरमाळा केंद्रातील नाथवाडी (ता.कळंब) जिल्हा परिषद शाळेची शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांनी पाहणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता तपासणीत समाधान कारक प्रतिसाद मिळाल्याने बुधवारी (दि.२१) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधीकारी डॉ. मैनाक घोष यांनी शाळेला भेट देऊन गुणवत्ता तपासणी केली.

यावेळी त्यांनीही वस्ती शाळेवरील गुणवत्ता पाहुन दोन्ही शिक्षिका मुख्याध्यापक एस.ए. सोळुंखे, पी.आर. लोकरे यांचे कौतुक केले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते भेटी दरम्यान शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

ग्रामीण भागातील शाळा, जि.प. शाळेची १ ते २० ऑगस्ट पर्यंत राज्यातील प्रत्येक शाळेची शालेय गुणवंत्ता विकास अभियान कार्यक्रम अंतर्गत तपासणी नुसार जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी रोज शाळांना भेटी देऊन तपासणी करीत आहेत.

१ ऑगस्ट रोजी शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांनी भेट दिल्यानंतर बुधवारी धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी शाळेतील विद्यार्थ्यांची तपसणी वेळी इंग्रजी वाचन, इंग्रजी वाक्याचे अर्थ, संख्या वाचन अभ्यासक्रमातील इतर विषयांच्या तोंडी विचारलेल्या प्रश्नांची दिलेली उत्तरे, शाळेच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहुन शाळेतील दोन्ही शिक्षिकांचे कौतुक केले.



यावेळी त्यांच्या सोबत गट शिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते उपस्थित होते.

आजपर्यंत नाथवाडी जि.प. शाळेच्या झालेल्या दोन्ही गुणवत्ता तपासणीत अधीकाऱ्यांच्या दोन्ही अधिकारी यांनी गुणवत्तेबाबत शाळेच्या शिक्षीकांचे कौतुक केल्याने, विद्यार्थ्यांच्या पालकांतून तसेच येरमाळा केंद्रातील शिक्षक वर्गातून शाळेच्या मुख्याध्यापक एस.ए. सोळुंखे, सहशिक्षिका पी.आर. लोकरे यांचे कौतुक होत आहे.

## वाशीच्या जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेची दुरावस्था!

### गतवैभव प्राप्त करून देण्याची विद्यार्थी, पालक, नागरिकांची मागणी...



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२० ऑगस्ट**

वाशी येथे पूर्वी नावाजलेली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वाशीची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. एकंदरीत केंद्रीय प्राथमिक शाळा वाशी ही पूर्वीचे वैभव प्राप्त करावे अशी नागरिकांची व पालकांची एकमुखी मागणी आहे.

पूर्वी वाशी हे भूम तालुक्यात होते. भूम तालुक्यातील शैक्षणिक सुधारणा तसेच विविध ट्रेनिंग जिल्ह्याचे कोणतेही कार्यक्रम हे वाशीच्या केंद्रीय प्राथमिक शाळेत कार्यक्रम घेत असत. एवढेच नाही तर एन.सी.ई.आर.टी.चा आठवड्याचा ट्रेनिंगचा कार्यक्रम वाशी येथे घेण्यात आला होता.

त्यावेळी जिल्ह्यातील सर्व अधिकारी तसेच संभाजीनगर विभागाचे सर्व एन. सी.आर.टी. चे मोठमोठे अधिकारी वाशी येथे कार्यक्रम घेऊन खुश होत होते. वाशी केंद्रीय शाळा पूर्वी चौथीपर्यंत होती. प्रत्येक वर्गाच्या चार चार तुकड्या होत्या.

त्यानंतर वाशी गावचे रहिवाशी असल्याले ४ ते ५ शिक्षक आल्यानंतर त्यांनी माजी सरपंच भाई भगवानराव उंदरे यांना योग्य असे मार्गदर्शन करून केंद्रीय शाळांमध्ये सातवी पर्यंतचे वर्ग काढले.

त्यावेळी पाचवी ते सातवी वर्गाचे चार चार तुकड्या होत्या व शाळेत मुख्याध्यापकासह २५ शिक्षकांचा स्टाफ होता. अशाप्रकारे केंद्रीय प्राथमिक शाळा ही जिल्ह्यात एक प्रसिद्ध अशी शाळा होती. परंतु सध्या केंद्रीय प्राथमिक शाळा हे नाव सुधा राहिले नाही तर सातबारावर नोंद गोदाम एक शाळा अशी नोंद आहे.

हा सर्व बदल केव्हा झाला? कोणी केला? याचे उत्तर मात्र समजून येत नाही २००१ पर्यंत केंद्रीय प्राथमिक शाळा हे नाव होते सध्याही केंद्रीय शाळा म्हणूनच ओळखली जाते. परंतु २००२ नंतर मात्र नावात बदल झाला. शाळेतील सर्व वर्ग बंद पडले केवळ पहिली ते चौथीपर्यंत वर्ग राहिले असून सध्या ८६ विद्यार्थी व ५ शिक्षक शाळेत आहेत. ज्या शाळेत २८ तुकड्या होत्या त्या शाळेत फक्त ८६ विद्यार्थी राहिले आहेत अशा अवस्थेला जबाबदार कोण? याची शिक्षण खात्याने दखल घेण्याची गरज असताना ते मात्र शाळा बंद कशी पडेल याकडे लक्ष देत आहेत. सध्या या चार-पाच वर्षापासून शाळेचे वातावरण बदलू लागले आहे. विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक होत आहेत शिक्षक स्टाफ मनापासून काम करत आहे व केंद्रीय प्राथमिक शाळा ही प्रगतीच्या मार्गावर येऊ लागली आहे. एवढे असूनही सध्या रात्रीच्या वेळी काही टुकार कंपनी गावातील शाळेच्या व्हरांड्यात बसत असून ते पान व तंबाखू खाऊन थुंकलेले दिसत आहेत.

सध्या शिक्षक, पालक, कमिटीचे अध्यक्ष हंसराज कवडे हे असून त्यांनीही घाण पाहून राग व्यक्त केला व शाळेची उर्जित अवस्था मागील सारखी आणण्यासाठी परिश्रम घेण्याचे ठरवले असून त्यांना गावातील काही लोकांनी सहकार्य करण्याचे ठरवले आहे.

विशेष म्हणजे केंद्रीय प्राथमिक शाळे शेजारी गटशिक्षण कार्यालय दिमाखात डौलत आहे. परंतु अधिकारी मात्र केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी प्रगती पथावर नेण्यासाठी मनापासून बघत नसल्याचे दिसून येत आहे.

### अत्याचार करणाऱ्या आरोपीला तात्काळ फाशी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ ऑगस्ट -**



बदलापुर येथील शाळेतील दोन चिमुकलींवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला तात्काळ फाशी द्यावी त्याचबरोबर या प्रकरणात निष्काळजीपणा करणाऱ्या शाळेतील इतर कर्मचाऱ्यांवर व शाळा प्रशासनावर तात्काळ कडक कारवाई करावी अशी मागणी नळदुर्ग पोलिस ठाण्यातील दक्षता समितीच्या महिला सदस्यांनी नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या निवेदनावर दक्षता समितीच्या सदस्या कल्पना गायकवाड, सुभद्राबाई मुळे, बाबई चव्हाण, कस्तुराबाई कारभारी, जिजाबाई जाधव व शाहेदाबी सय्यद यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अग्रलेख...

# अन्यायाविरोधात दाद मागणारा दुजाभाव

बदलापुरात सफाई कर्मचाऱ्याने दोन चिमुकल्या मुलींवर केलेल्या अत्याचाराच्या मन हेलावून टाकणाऱ्या घटनेनंतर उभ्या झालेल्या जनआक्रोशामुळे सरकारने तीन पोलिसांना निलंबित केले असून या प्रकरणाची जलद गती न्यायालयात सुनावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. अतिशय दुर्दैवी, निंदनीय आणि मन हेलावून टाकणाऱ्या या प्रकरणात वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंह यांच्या अध्यक्षतेत एसआयटी गठित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सोबतच या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पण एवढ्यानेच न्याय मिळाला, असे म्हणता येणार नाही. संबंधित आरोपीला कठोरात कठोर शिक्षा लवकरात लवकर होण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना केल्या जायला हव्यात. बदलापूरच्या घटनेचा तीव्र निषेध व्हायलाच हवा आणि तो लोकांनी व्यक्त केलादेखील. कोणत्याही सभ्य समाजात अशा घटना कायदा आणि सुव्यवस्थेचा धाक नसल्यामुळे अथवा कसेही वागा, कोणीही आपले काहीही वाकडे करू शकत नाही, अशा निर्ढावलेल्या वृत्तीमुळेच होऊ शकतात. अशा गंभीर घटनांमध्ये राजकीय पोळी शेकण्याचा विरोधकांचा सुरू असलेला प्रयत्न दुर्दैवीच म्हणायला हवा. एकीकडे बदलापूरच्या घटनेत एकतेची वज्रमूठ दाखवणारे विरोधक कोलकात्यामध्ये एका प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीची बलात्कार करून हत्या करण्याच्या हैवानी प्रकाराबाबत चकार शब्द काढायला तयार नाही. एरवी छोट्या-मोठ्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी की कॅमेरापुढे चमकोगिरी करण्यासाठी विभिन्न राज्यांमधील घटनास्थळी धाव घेणारे राहुल गांधी, प्रियांका वढेरांसह इंडिया आघाडीच्या नेत्यांना ना अयोध्येत धाव घ्यावीशी वाटली ना कोलकात्यातील अत्याचाराची दखल घेण्याची उपरती झाली. या नृशंस घटनेबद्दल ट्विट करण्याची वा समाजमाध्यमांद्वारे जनजागृती करण्याचीदेखील त्यांना गरज भासली नाही. कोलकात्याच्या रस्त्यांवर गोंधळ घालण्यासाठी उतरलेल्या हजारो समाजकंटकांवर कारवाई व्हावी, घटना घडली त्या इस्पितळातील तोडफोडीचा निषेध व्हावा, यासाठीही पुढाकार घेण्यात त्यांनी स्वारस्य दाखविले नाही. या घटनांचा निषेध करताना त्यांची जीभ मात्र कचरली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे कोलकात्याच्या दुर्घटनेबद्दल बोलताना म्हणाल्या, देशात अशा खूप साऱ्या घटना होतात; त्यांचा आम्ही निषेध करतो. ममता बॅनर्जी अतिशय संवेदनशील नेत्या असून त्या या प्रकरणात लवकरात लवकर कारवाई करतील, असा मला विश्वास आहे. आपल्या मित्र पक्षाचे सरकार पश्चिम बंगालमध्ये आहे म्हणून त्याबद्दल सावध प्रतिक्रिया द्यायची आणि महाराष्ट्रातील बदलापूरमध्ये शेकडो लोकांना गोळा करून उपद्रव करायचा, हे म्हणजे 'पीक अँड चूज' प्रकारातले म्हणायला हवे.

खरोखरीच विरोधकांना न्यायाची चाड असेल तर आरोपी बदलापूरचे असोत की हैदराबाद, अयोध्या, कोलकात्याचे... न्यायासाठी एकतेची वज्रमूठ बांधावी. रस्त्यावर उतरावे. संबंधित संस्थांमध्ये धुडगूस घालावा. त्या संस्थांच्या मालमत्तेचे नुकसान करावे. त्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रामाणिकतेबाबत संशय उपस्थित करावा. पोलिसांच्या तपासातील फोलपणा उघड करावा. पण नाही भाजपाशासित राज्यात होणाऱ्या बलात्काराच्या घटना अमानवीय, तेथील सरकार अकार्यक्षम, यंत्रणा गुन्हेगारांना संरक्षण देणारी, प्रशासन गोरगरिबांच्या न्यायाकडे दुर्लक्ष करणारे, दलितांबाबत कणव नसणारे, मागासवर्गीयांबद्दल असंवेदनशील आणि अल्पसंख्यकांची चिंता न करणारे असे दोषारोपण करून विरोधक मोकळे होत आहेत. बदलापुरात १० तास लोकलची वाहतूक रोखून धरणाऱ्यांनी कोलकात्यात असा पुढाकार का घेतला नाही, असा प्रश्न उपस्थित झाला तर यांच्याजवळ काय उत्तर आहे. उलट ममता बॅनर्जी यांच्यासाठी संवेदनशील नेत्या आहेत. त्यांची संवेदनशीलता संदेशखालीमध्येही दिसून आली नाही. आपल्याच पक्षाचा नेता संदेशखालीतील असहाय्य महिलांवर अत्याचार करतो, त्यांच्याकडून खंडणी वसुली करतो, त्यांना धमकावतो, त्यांचे भूखंड बळकावतो, तेव्हा कुठे जाते ममतांची संवेदनशीलता? त्यांना प्रत्येक गोष्टीत राजकारण करायचे आहे. बदलापूरमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेले राजकारण साऱ्यांनी उघड्या डोळ्यांनी बघितले. इतक्या जबाबदार पदावर राहिलेल्या व्यक्तीला इतक्या खालच्या थराचे राजकारण करणे शोभले का, असा प्रश्न विचारला जाऊ लागला तर तुम्ही जनतेला दोष देणार का? अशा प्रकरणात पीडितांना तत्परतेने न्याय कसा मिळवून देता येईल, याचा प्रयत्न व्हायला हवा होता. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि मुलींना न्याय देणे हे केवळ सरकारचेच कर्तव्य नसते. विरोधकांनाही सरकारला साथ द्यायची असते. मात्र, सध्या विरोधक देशात अराजकता कशी माजेल, याच्या तयारीत आहेत. संसदेत बिनबुडाची भाषणे करणे, आरडाओरड करणे, मोदींना दोष देणे हा एककलमी कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. आता महाराष्ट्रात त्यांच्या डोळ्यात देवेंद्र फडणवीस खुपून राहिले आहेत. त्यांना काही माध्यमांचीही साथ मिळाली आहे. देशात गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. देशात केवळ चोऱ्यामाऱ्या, बलात्कार, खंडणीखोरी, फसवणुकीचेच प्रकार होत आहेत, असा जनतेचा समज करून देण्याचा यांनी विडा उचलला आहे. फडणवीसांचा मराठा आंदोलनाला कसा विरोध आहे, हे सिद्ध करण्यासाठी मनोज जरांगे यांना पुढे केले आहे. दुसरीकडे भाजपा, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या पक्षांच्या डोळ्यातील कुसळ काढण्याची जबाबदारी सकाळी नऊच्या भोंग्याने स्वीकारली आहे. बाळासाहेबांच्या विचारांचे या पाईकांनी आता हिरव्या बावट्यांपुढे शरणागती पत्करली आहे. असो.

बदलापूर घटनेच्या निमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील प्रत्येक अत्याचाराविरुद्ध न्याय मिळविण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांची वज्रमूठ बांधली जायला हवी का? विरोधकांना पीडित परिवाराला न्याय मिळवून देण्यात रस आहे की त्यांना निव्वळ गोंधळ घालून देशात गृहयुद्ध भडकवायचे आहे? प्रत्येक वेळी मुख्यमंत्री, गृहमंत्री अथवा संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्याने काही साध्य होणार आहे का? बदलापूरमध्ये एका हाकेसरशी गोळा झालेल्या लोकांमध्ये पालकांची संख्या किती होती? गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच्या दोषासाठी शाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी कितपत योग्य आहे? एरवी आंदोलनांचे श्रेय घेण्यासाठी पुढे पुढे करणारे पुढारी या आंदोलनात नेमके कुठे दिसेनासे झाले? लोकसभेत फटका बसल्यामुळे त्यापासून धडा घेत सावरण्यासाठी सत्ताधारी पक्षाने एकापाठोपाठ एक घेतलेल्या निर्णयांमुळे घाबरलेल्या विरोधकांनी बदलापूरच्या निमित्ताने वचपा तर काढला नाही? आम्हाला लाडकी बहीण नको, आम्हाला लाडक्या बहिणींच्या चिमुकल्यांसाठी न्याय हवा, ही आंदोलनकर्त्या महिलांची मागणी, या घटनेवरून केल्या गेलेल्या राजकारणाकडे अंगुलिनिर्देश करते की नाही? मुळात मुद्दा असा आहे की, घटना झाल्यानंतर आपल्याला जाग येते. त्या घडू नये यासाठी काही प्रयत्न केले जायला हवेत की नको? दिल्लीच्या निर्भया प्रकरणात सारा भारत एकवटूनही न्यायाला किती विलंब लागला, हे आपण साऱ्यांनी बघितले आहे. या पृष्ठभूमीवर मुलींच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूकता आणण्याची गरज आहे. मुलांनाही वर्तणुकीचे धडे सातत्याने दिले जायला हवे. सर्वत्र बोकाळलेल्या स्वैराचारावर निर्बंध आणायला हवेत. बहुतांश गुन्ह्यांमध्ये दारू हा महत्त्वाचा घटक असतो. त्यामुळे दारू प्राशनाचे कायदे अधिक कठोर करण्याची गरज आहे. इंटरनेटमुळे पोर्नोग्राफीचाही सुळसुळाट झाला आहे; तो आटोक्यात आणण्याची गरज आहे. सत्ताधाऱ्यांनीही केवळ विरोधकांच्या भूमिकेबाबत संशय घेण्याऐवजी आपल्या जबाबदारीचे योग्य प्रकारे निर्वहन करण्याची अपेक्षा व्यक्त करताना विरोधक अन्यायाविरोधात दाद मागताना दुजाभाव करीत आहेत, ही बाबही अधोरेखित केली जायला हवी.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# वक्फ कायद्यात नियंत्रणात्मक सुधारणा

८ ऑगस्ट २०२४ रोजी 'एकीकृत वक्फ प्रबंधन सशक्तीकरण दक्षता आणि विकास अधिनियम १९९५' लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आले. बिल पटलावर ठेवताना कोणत्याही प्रकारे मुसलमानांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करता, त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य कायम राखत लोकाभिमुखता आणण्याचा हा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री किरण रिजिजू यांनी केले. फाळणीच्या पृष्ठभूमीवर भारतातून पाकिस्तानात गेलेल्या अनेक मुस्लिम कुटुंबांनी जाताना घाईघाईने आपली संपत्ती वक्फ केली. या मागील कारस्थान असे की, पाकिस्तानात जाऊन तिथे बहुसंख्य मुस्लिम असल्याने ती जमीन दार-उल-इस्लाम करायची. म्हणजे तेथील सगळे कायदे आणि व्यवस्था इस्लामप्रमाणे प्रस्थापित करायची. या इस्लामिक व्यवस्थेचा फायदा घेऊन हिंदूंना तेथून पळवून लावून त्यांची तेथील जमीन व संपत्ती हडप करायची. त्याच वेळी येथील मुसलमानांची संपत्ती व जमीन हिंदूंना ताब्यात घेता येऊ नये म्हणून वक्फ करायची. त्यायोगे हिंदुस्थानातील मुस्लिम संपत्ती आणि जमीन इस्लामिक लोकांच्याच हातात राहून त्याचा फायदा फक्त मुसलमानांनाच मिळेल. म्हणजे पाकिस्तान तर घेतलाच आहे; पण भारतातील मुसलमानांची जमीन व संपत्तीवरदेखील इस्लामचाच ताबा ठेवायचा. हे कटकारस्थान लक्षात येऊनही तेव्हा सत्तेवर असलेल्या जवाहरलाल नेहरू आणि काँग्रेस यांनी १९५४ मध्ये मुस्लिम धर्मातील विविध संकल्पनांना अनुसरून वक्फ कायदा पारित करीत वक्फ बोर्डाची स्थापना केली. या कायद्याच्या व बोर्डाच्या स्थापनेमागे जरी वरपांगी उद्देश वक्फ म्हणजे मुस्लिम धर्मदाय संस्था व त्यांच्या संपत्ती व जमिनीचे आगणन आणि नियंत्रण करणे असा सांगितला गेला तरी मुळ उद्देश पाकिस्तानात निघून गेलेल्या मुसलमानांची संपत्ती हिंदूंनी ताब्यात घेऊ नये हाच होता, असेच काँग्रेस पक्षाने या कायद्यात १९९५ मध्ये नरसिंह राव आणि २०१३ मध्ये मनमोहनसिंग यांच्या काळात केलेले बदल पाहता म्हणावे लागते. वक्फ बोर्डाचा पदसिद्ध अध्यक्ष हा भारताचा अल्पसंख्यक मंत्री असतो. (स्मृती इराणी आणि विद्यमान किरण रिजिजू यांचा अपवाद वगळता जे सगळे मुस्लिमच होते.) या वक्फ बोर्डावर नेमण्यात येणाऱ्या सर्व व्यक्ती मुस्लिमच असायला हव्यात. कोणत्याही संपत्तीबद्दल काहीही विवाद असेल तर तो वक्फ बोर्ड ट्रॅब्यूनल समोरच प्रथम मांडण्यात यावा. वक्फ सर्वे कमिशनने एखादी संपत्ती वक्फची म्हणून जाहीर केली व त्यावर कोणीही आक्षेप न नोंदविला तर ती संपत्ती वक्फच्या मालकीची समजावी. अशी अतार्किक पण मुस्लिमधार्जिणी प्रावधाने या कायद्यात काँग्रेसच्या सत्ता काळात केली गेली. परिणामी वक्फ बोर्डाचे एका लोकशाही विरोधी, हिंदू विरोधी अशा कायदेशीर संस्थेत रूपांतर झाले. या वक्फ कायद्यात आणि त्यायोगे वक्फ बोर्डाच्या अधिकारांना लगाम घालणे आवश्यक होऊन बसले होते. मोदी सरकारने वक्फ कायद्याने वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्यादित अधिकारांना नियंत्रित करून या बोर्डाला अधिक पारदर्शक, लोकाभिमुख व उत्तरदायी बनवण्याचा प्रयत्न केलेला आहे. मोदी सरकारने वक्फच्या कायद्यात काही बदल करण्याची शिफारस केलेली आहे. हे बदल सर्व समाजाने आणि त्यातही हिंदू समाजाने समजून घेतले पाहिजेत.

**१.** पहिला महत्त्वाचा बदल म्हणजे तोंडी वक्फ तयार करता येणार नाही. म्हणजे आता वक्फ तयार करण्यासाठी 'वक्फ डीड' असणे आवश्यक राहील. याचा अर्थ कोणीही कोणाच्याही जवळ फक्त संपत्ती वक्फ करण्याची इच्छा व्यक्त केली म्हणून संपत्ती वक्फ होणार नाही. कायदा लागू झाल्यापासून वक्फ करण्यात आलेल्या सर्व संपत्तींची नोंदणीकृत कागदपत्रे आवश्यक होतील. आधीच्या कायद्यात असलेले तोंडी वक्फ करण्याचे प्रावधान निरस्त करण्याची शिफारस करण्यात आली आहे. म्हणजे जर वक्फ बोर्डाने एखादी संपत्ती आपल्या मालकीची आहे, असा दावा केला तर तो दावा त्यांना नोंदणीकृत कागदपत्रांच्या आधारे सिद्ध करावा लागेल. **२.** दुसरा महत्त्वपूर्ण बदल म्हणजे वक्फ बोर्डावर दोन मुस्लिम महिला व दोन गैरमुस्लिम व्यक्तींची नेमणूक करावी लागेल. म्हणजे अध्यक्ष अधिक १० सभासद (१+१०=११) अशा बोर्डाच्या रचनेत दोन मुस्लिम स्त्रिया व दोन गैरमुस्लिम व्यक्ती असणे आवश्यक राहील. यामुळे वक्फच्या नावाखाली इतर समाजांच्या विरोधात होणारी कारस्थाने वा लांड्यालबाड्यांवर मर्यादा येतील. **३.** याशिवाय या बोर्डावर अहमदिया, बोहरी, आगाखानी, सुन्नी व शिया पंथांच्या व्यक्तींना प्रतिनिधित्व देणे अनिवार्य केले आहे. आतापर्यंत या देशातील बहुसंख्य असलेल्या सुन्नी पंथीय व्यक्तींचीच नेमणूक या बोर्डावर करण्यात येत असे. या नवीन प्रावधानामुळे विविध इस्लामिक पंथांना व जातींना वक्फ बोर्डावर प्रतिनिधित्व मिळून ते अधिक लोकाभिमुख होणार आहे. मुस्लिम समाजातील माघारलेल्या जाती-जमातींतील तसेच खालच्या स्तरातील लोकांनादेखील प्रतिनिधित्व मिळेल. उदाहरणार्थ पसमंदा मुस्लिम तसेच यामुळे या बोर्डाद्वारे पसरविण्यात येणाऱ्या कट्टरतेला आळा बसेल, असे म्हणायला जागा आहे. **४.** या आधीच्या प्रावधानांनुसार कोणत्याही संपत्तीच्या मालकी हक्कासंबंधी कोणताही विवाद हा फक्त 'वक्फ न्यायाधीकरणाच्या (ट्रॅब्यूनल)' समोर मांडणे आवश्यक होते. या वक्फ न्यायाधीकरणावरील सर्व नेमणुका वक्फ बोर्ड करीत असे. त्यामुळे वकिलांपासून पीठासीन अधिकाऱ्यांपर्यंत सगळे मुस्लिमच असत. यामुळे बहुतेक वेळा विवाद जर गैरमुस्लिम पक्षाशी असेल तर निर्णय हे वक्फ बोर्डाच्या किंवा मुस्लिम पक्षाच्या बाजूनेच लागत असत. शिवाय जाणूनबुजून अनेक विवादांमध्ये निर्णय येण्यासाठी बराच कालावधी लावला जात असे. तसेच त्या विवादाचा निर्णय लागेपर्यंत विवादित संपत्ती ही वक्फची संपत्ती मानली जात असे. देशभरामध्ये वक्फशी संबंधित संपत्तीचे ५८ हजार खटले वक्फ न्यायाधीकरणाकडे आज प्रलंबित आहेत. न्यायाधीकरणाच्या निर्णयानंतर मग उच्च न्यायालय, त्यानंतर सर्वोच्च न्यायालय अशी प्रक्रिया पूर्ण करावी लागते. आता नवीन प्रावधानानुसार वक्फशी संबंधित जमिनीचे विवाद वक्फ न्यायाधीकरणाच्या न्याय कक्षेत न राहता सामान्य जमिनीच्या विवादांप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या न्याय क्षेत्रात येतील. तसेच जोपर्यंत जिल्हाधिकारी विवादावरील अहवाल सरकारला देत नाही तोपर्यंत ती संपत्ती वक्फ बोर्डाची संपत्ती मानली जाणार नाही. या आधी वक्फ बोर्डाने एखाद्या संपत्तीवर आपला मालकी हक्क सांगितला की त्याच्या विरोधात निर्णय येईपर्यंत ती वक्फ बोर्डाची संपत्ती समजली जात होती. हा एक महत्त्वपूर्ण बदल या संशोधित बिलाने होणार आहे. या संशोधनाचा परिणाम पक्षकारांना वेगवान तसेच कमी खर्चात योग्य न्याय मिळण्यात होईल, हे निश्चित. **५.** या आधी वक्फच्या 'मुत्तावली'ना काही विशेष अधिकार प्रदान करण्यात आले होते. या सुधारित बिलाने मुत्तावलीच्या अधिकारांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात लगाम घालण्याचा प्रयत्न आहे. आता कोणत्याही संपत्तीचा विवाद सोडवणुकीसाठी मुत्तावली, मिटिंग करण्यासाठी खर्च, कोणताही चार्ज वा खर्च पक्षकार तसेच वक्फ बोर्डाला लावू शकणार नाही. या प्रावधानामुळे अकारण विवाद निर्माण करीत गावोगावी होणाऱ्या प्रत्येक जमिनीच्या व्यवहारातून हिंदूंकडून काही पैसा उकळण्याचा मुत्तावलींच्या गोरख धंद्याला चाप बसेल. **६.** सरकारमधील जॉईंट सेक्रेटरी दर्जाच्या अधिकाऱ्याचीच बोर्डाचा कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करता येईल. यामुळे वक्फ बोर्डाच्या सर्वसाधारण प्रशासकीय दर्जामध्ये वाढ होऊन कार्यालयीन शिस्त वाढेल, असे समजायला हरकत नाही. त्याचवेळी...

याचा अर्थ आज जरी बहुसंख्य हिंदू वक्फ कायदा निरस्त करण्याची मागणी करीत असले आणि असदुद्दीन ओवैसींसारखे मुस्लिम वा काही विरोधी पक्षातील नेते हे बिल म्हणजे मुसलमानांचे धर्म स्वातंत्र्य हिरावून घेणे म्हणत असले, तरी केंद्र सरकारने वक्फ बोर्डाला आधीच्या कायद्यांनी दिलेले अमर्यादित अधिकार फक्त नियंत्रित करण्याचे हे प्रयत्न आहेत, असेच म्हणावे लागते.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# मानसिक विकृती

देशात आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस दुर्गोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मातृपूजनाची संस्कृती असलेल्या आमच्या देशाची ही सांस्कृतिक परंपरा. त्यातही दुर्गोत्सवासाठी विशेष ओळख आहे, ती पश्चिम बंगालची. नवरात्रीतील नऊ दिवसांसह वर्षभर परमेश्वराची आराधना करीत असताना 'मातृरुपेणं संस्थिता' असे मागणे त्या जगन्नियंत्याकडे आपण मागत असतो. ही आनंददायी आणि अभिमानास्पद बाब असतानाच दुसरीकडे मात्र देशात घडणाऱ्या घटना मन पिळवटून टाकणाऱ्या आहेत. ज्या पश्चिम बंगालमध्ये देशात नव्हे, जगात सर्वात मोठा दुर्गोत्सव साजरा होतो, त्याच पश्चिम बंगालची राजधानी असलेल्या कोलकाता शहरात निवासी डॉक्टरवर अमानुष अत्याचार होतो. या वेदनादायी वृत्ताची शाई वाळण्यापूर्वीच परस्त्रीला मातेसमान मानणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात बदलापूर शहरात बालवाडीत शिकत असलेल्या दोन चिमुकल्या मुलींवर एका नराधमाने अत्याचार केल्याचे वृत्त येते. त्यातून सावरत असतानाच अकोला जिल्ह्यातील बाळापूरमधील काजीखेड येथे एका शिक्षकाने त्याच्या सहा विद्यार्थिनींना अश्लील चित्रफीत दाखवत त्यांच्यासोबत लगट करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटना मन सुन्न करणाऱ्याच!

जिला आम्ही माता म्हणतो, जिच्या रक्षणाचा संकल्प दरवर्षी रक्षाबंधनातून घट्ट करतो, तिचे लचके जेव्हा तोडले जातात. कुठे एक जण तर कुठे माणसांच्या रूपात असलेला हिंस्र कळप तिच्यावर तुटून पडतो. कधी अनपेक्षित तर कधी कट रचून नराधम डाव साधतात तेव्हा या नरपशूसाठी अत्यंत कठोर, विकृतांच्या विकृतीला जरब बसविणारी शिक्षा तातडीने व्हावी, अशी भावना प्रत्येकाची असते. यात दोषी असणाऱ्याची पृष्ठभूमी काहीही असो, त्याचा जात, धर्म, पंथ याचा विचार न करता शासन-प्रशासनाने या जनभावनेची अंमलबजावणी ही रास्त अपेक्षा असते. ती योग्यच आहे. पण ज्यावेळी या अपेक्षेला छेद देण्याचा प्रयत्न होतो तेव्हा जनक्षोभ उसळतो. ही अत्यंत स्वाभाविक भावना आहे.



कोलकाता येथे आरजी कार मेडिकल कॉलेज येथील घटना ९ ऑगस्ट रोजी समोर आली. त्यानंतर ही घटना आत्महत्या भासविण्याचा प्रयत्न केला गेला. एवढेच नव्हे, तर पीडितेच्या पालकांना मृतदेह पाहू दिला नाही आणि त्यावरही कळस म्हणजे सकाळी घटना उघडकीस येऊनही रात्री उशिरापर्यंत याबाबत पोलिस तक्रार नोंदविली गेली नव्हती. पीडितेचा शवविच्छेदन अहवाल तर सुन्न करणारा आहे. शेवटी कोलकाता उच्च न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्याचे आदेश दिले. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने याची सुनावणी स्वतःकडे घेतली. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी पश्चिम बंगाल सरकारच्या कामगिरीवर अनेक प्रश्न उपस्थित करून जाब विचारला. पण कोडग्या राज्य शासनाने कुणाला तरी वाचविण्याच्या प्रयत्नात माणुसकीच्या सर्व मर्यादा पार केल्याचे दिसून येते. कारण अद्याप या प्रकरणातील सत्य समोर आले नाही. पण दुसरीकडे याबाबत माध्यमांशी संवाद साधणाऱ्या व्यक्तींना राज्य शासन नोटीस बजावते. दुर्दैव म्हणजे हा सर्व घटनाक्रम पश्चिम बंगालमधील असून तेथील मुख्यमंत्रिपद महिला भूषवित आहे. दुसरी घटना मुंबईनजीक असलेल्या बदलापूरची. येथे नकळत्या वयातील चिमुकलींचे लचके तोडणारा पिशाचचे काळे कारनामे समोर आले. दुर्दैवाने येथेही पोलिस अधिकारी असलेल्या महिलेने तक्रार दाखल करून घेण्यास उशीर केला. म्हणूनच जनक्षोभ उसळला. पण राज्य शासनाने त्याची तत्काळ दखल घेऊन दोषी असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित केले. तसेच या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करणार असल्याची घोषणा केली. एवढेच नव्हे, तर हा खटला जलद न्यायालयात चालविण्याचे सांगितले. राज्यातील दुसऱ्या घटनेतील अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील आरोपीला तातडीने अटक करण्यात आली आहे.

समाज व्यवस्थेत आधुनिकतेच्या नावाखाली धुडगूस घालणाऱ्या अनेक बाबी कारणीभूत आहेत. त्यातही मोबाईलमधून नको त्या बाबी पाहण्याचा छंद अनेकांना कळत्या-नकळत्या वयात लागल्याचे दिसून येते. यातून उद्दीपित होणाऱ्या विकृत भावना हेही एक कारण आहेच. या मानसिक विकृतीला आळा घालण्यासाठी कायद्यांच्या कठोर अंमलबजावणीसह समाजात नैतिक मूल्यांच्या रुजवणुकीचे प्रयत्न आवश्यक आहेत.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# लॅटरल एंट्री, काँग्रेसची भूमिका आणि मोदी सरकार

केंद्र सरकारच्या सेवेत थेट भरतीने (लॅटरल एंट्री) सहसंचालक, संचालक आणि उपसंचालक अशा ४५ जागा भरण्याचा निर्णय सरकारने मागे घेतला. हा निर्णय म्हणजे सरकारची आणि भाजपाची माघार आणि आपला विजय असल्याचा समज काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी करून घेतला आहे. थेट भरतीच्या निर्णयात काही सुधारणा करण्यासाठी सरकारने या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिल्याची घोषणा माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. थेट भरतीत आरक्षणाचा सिद्धांत लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेबद्दलची प्रतिबद्धता दिसून येत असल्याचा निर्वाळाही वैष्णव यांनी दिला आहे. राजकारणात अनेक वेळा दोन पावलं पुढे जाण्यासाठी एक पाऊल मागे घ्यावे लागते, तसे सरकारच्या या निर्णयाबद्दल म्हणावे लागेल.

खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विशेषज्ञांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा सरकारला फायदा व्हावा, म्हणून थेट भरतीचा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय मोदी सरकारने २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर घेतला, असे काही जणांना वाटू शकते; पण वस्तुस्थिती तशी नाही. काँग्रेस नेते एम. वीरप्पा मोईली यांच्या नेतृत्वातील दुसऱ्या प्रशासकीय आयोगाने २००५ मध्ये सरकारी सेवेत काही क्षेत्रातील लोकांना सामावून घेण्याची शिफारस केली होती. त्यानुसार सरकारी सेवेत खाजगी क्षेत्रातील लोकांचा प्रवेश सुरू झाला होता. मात्र, आज काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष ज्या कारणाने थेट भरतीचा विरोध करीत आहेत, त्या आरक्षणाच्या मुद्याची पूर्तता काँग्रेसच्या सरकारने आपल्या कार्यकाळातही केली नव्हती. थेट भरतीचा हा निर्णय अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींवर अन्याय करणारा असून सरकारी नोकऱ्यातील आरक्षण रद्द करण्याचा मोदी सरकारचा हा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेसने केला. थेट भरतीचा हा निर्णय संविधानाच्या विरोधात असल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचा हा आरोप खरा मानला तर काँग्रेसच्या नेतृत्वातील संपुआ सरकारने संविधानविरोधी आणि दलित, आदिवासी आणि ओबीसींवर अन्याय करणारा, त्यांचे हक्क हिरावण्याचा निर्णय घेतल्याचे म्हणावे लागेल. म्हणजे भाजपाला दलित, आदिवासी आणि ओबीसीविरोधी ठरवणारी काँग्रेस स्वतःच दलित, आदिवासी आणि ओबीसीविरोधी आहे, असे म्हणावे लागेल. एक बोट दुसऱ्यावर (मोदी सरकारवर) रोखताना उर्वरित चार बोटं आपल्याकडे वळलेली असतात, तसे काँग्रेसचे या मुद्यावर झाले आहे. मुळात काँग्रेसचा हा आरोप राजकीय हेतूने प्रेरित आहे, तसेच काँग्रेसची ही पश्चातबुद्धी म्हटली पाहिजे. तसे नसते तर थेट भरती लागू करताना काँग्रेसने त्यात आरक्षणाची तरतूद केली असती. पण काँग्रेसने हा निर्णय घेतला, तेव्हा त्यांना त्यात आरक्षणाची गरज वाटली नाही. आणि आज मोदी सरकारने व्यापक हितासाठी थेट भरतीचा निर्णय घेतल्यावर काँग्रेस आता थयथयाट करत आहे. विशेष म्हणजे काँग्रेसने थेट भरतीचा निर्णय २००५ मध्ये अधिकृतपणे घेतला असला, तरी त्याच्या कितीतरी वर्षे आधी आपल्या देशात या पद्धतीने थेट भरती करण्यात आली. संपुआ शासन काळात २००४ ते २०१४ अशी १० वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवणाऱ्या डॉ. मनमोहनसिंग यांचा याच पद्धतीने अर्थसचिव म्हणून १९७६ मध्ये सरकारी सेवेत प्रवेश झाला होता. मोंटेकसिंग अहलुवालिया यांनाही याच पद्धतीने आताच्या नीती आयोगाचे तसेच तेव्हाच्या योजना आयोगाचे उपाध्यक्ष करण्यात आले होते. सोनिया गांधी यांनी आपल्याकडे राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे अध्यक्षपदही या मार्गाने मिळविले होते. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनसिंह मेघवाल यांनी हा आरोप केल्यामुळे त्यात निश्चितच तथ्य असले पाहिजे. काँग्रेसच्या सरकारने थेट भरतीची ही योजना मनमानी पद्धतीने राबवली, पण मोदी सरकारने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून (युपीएससी) या भरतीला कायदेशीर रूप दिले. २०१८ मध्ये युपीएससीने पहिल्यांदा या पद्धतीने भरती केली. तेव्हा सहसचिवपदासाठी ६०७७ अर्ज आले होते; यातून युपीएससीने फक्त ९ जणांची निवड केली. विशेष म्हणजे या पद्धतीने भरती झालेले विविध मंत्रालयातील ९ सहसचिव आयएएस अधिकाऱ्यांच्या क्षमतेने आणि कौशल्याने सेवा देत आहेत. असे अनेक सहसचिव प्रस्तुत लेखकाच्या परिचयात आहेत. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी ४५ जागांसाठी थेट भरतीच्या प्रक्रियेला आव्हान देणे समजण्यासारखे आहे; मात्र सरकारची खरी अडचण जदयु आणि लोकजनशक्ती या मित्रपक्षांनीही या प्रक्रियेवर आक्षेप घेतल्यामुळे झाली असावी, असे वाटते. जदयुचे राजीवरंजन उर्फ ललनसिंह तसेच लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पासवान केंद्रीय मंत्रिमंडळात आहेत. त्यामुळे या दोन पक्षांच्या नाराजीची दखल घेत मोदी सरकारने थेट भरतीचा हा निर्णय तात्पुरता स्थगित केला, असे समजायला हरकत नाही. थेट भरतीचा हा निर्णय स्थगित करत मोदी सरकारने एकप्रकारे विरोधी पक्षांच्या हातातील निवडणुकीच्या काळातील अपप्रचाराचे अस्त्रही निष्प्रभ केले, असे म्हणायला हरकत नाही. हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. येत्या महिनाभरात महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकीचीही घोषणा होणार आहे. पुढील वर्षीच्या सुरुवातीला दिल्ली विधानसभेची निवडणूक होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात या मुद्यावरून विरोधक जनतेची दिशाभूल करण्याची शक्यता असल्यामुळे विरोधकांचा तो प्रयत्न हाणून पाडण्यासाठी मोदी सरकारने थेट भरतीचा निर्णय स्थगित केला, असे दिसते. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी आरक्षण आणि संविधान बदल या मुद्यावरून अपप्रचाराची राळ उडवली होती. त्याचा काही प्रमाणात भाजपाला फटका बसला, हे नाकारता येणार नाही. 'दुधाने तोंड भाजले की पिणारा ताकही फुंकून पीत असतो.' मोदी सरकारची स्थिती या मुद्यावर तशी झाली आहे.

आरक्षण हटवण्याचा तसेच संविधान बदलण्याचा विचार भाजपा आणि मोदी सरकार स्वप्नातही करू शकत नाही. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर काँग्रेसने ते जिवंत असताना तसेच त्यांच्या मृत्यूनंतरही जेवढा अन्याय केला, तेवढा दुसरा कोणी केला नाही. तीच काँग्रेस आज आरक्षण आणि संविधानाच्या मुद्यावर भाजपाला आणि मोदी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न करत आहे. दलित, आदिवासी आणि ओबीसी वर्गाच्या कल्याणासाठी मोदी सरकारने आपल्या १० वर्षांच्या कार्यकाळात जेवढ्या कल्याणकारी योजना राबवल्या, त्याच्या एकदशांशही काँग्रेसला आपल्या ६० वर्षांच्या शासन काळात राबवता आल्या नाहीत. आज आपला विजय आणि मोदी सरकारचा पराभव झाला, असे काँग्रेसला वाटप असले, तरी तो त्यांचा भ्रम आहे. याचा प्रत्यय त्यांना लवकरच आल्याशिवाय राहणार नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### रवींद्रनगरातही संताप

पश्चिम बंगालमधील कोलकाता शहरात मेडिकल कॉलेजमध्ये ट्रेनी महिला डॉक्टरवर झालेल्या बलात्कार व निर्घृण हत्या प्रकरणाने संपूर्ण देशातील वातावरण ढवळून निघाले. असे निर्घृण कृत्य एकटी-दुकटी व्यक्ती करू शकत नाही. हा गँगरेपचा प्रकार असावा असे वाटते. पश्चिम बंगाल सरकारने या घटनेबाबत वेगवेगळी विधाने केली. डॉक्टर मुलीच्या आई-वडिलांना तीन तास मृतदेह दाखवला नाही. कॉलेजच्या प्राचार्यांना लगेच दुसऱ्या कॉलेजमध्ये रुजू करून घेण्यात आले. या सर्व गोष्टी हत्याऱ्याला वाचवणाऱ्या, मदत करणाऱ्या होत्या म्हणूनच संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली. सरकार विरोधी जनता, देशातील सर्व डॉक्टर्स रस्त्यावर उतरले इतकी संतापजनक आणि दुर्दैवी घटना घडल्यावर निषेध तर होणारच. सर्व स्तरांवरून या घटनेचा निषेध होत आहे. यात नागपुरातील रवींद्रनगर मागे कसे राहील. या नगरातील लोक तर देशात कुठलीही आनंदाची अथवा दुःखाची घटना घडली तरी त्यावर प्रतिक्रिया देतातच तसेच एक सामाजिक दायित्व निभावणारी व एक जागृत नागरिकांची वसाहत म्हणून रवींद्रनगरची ओळख आहे. या वसाहतीतील नागरिकांनी कॅण्डल मार्च काढून घटनेचा निषेध केला. या मार्चमध्ये आठ डॉक्टर्स, बाकी सर्व आबालवृद्ध असे जवळपास १२५ नागरिक होते. अतिशय शांतपणे कॅण्डल मार्च काढून व शेवटी शान्तिमंत्र म्हणून श्रद्धांजली वाहण्यात आली.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### ठोस उपाय आवश्यक

पश्चिम बंगालमधील कोलकात्यात अतिशय घृणास्पद आणि क्रूर घटना घडली. या घटनेची दाहकता अद्याप शमलेली नाही तोच बदलापुरात दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याची चिड आणणारी घृणास्पद घटना घडली. मुलींची सुरक्षा हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याकरिता ठोस उपाय आवश्यक आहे. आंध्रमध्ये (तेलंगणा) बऱ्याच वर्षांपासून एक नियम लागू केला आहे. मुलींच्या शाळेत फक्त महिला शिक्षिका, महिला चपराशी आणि सफाई कामगार महिलाच राहतील. पूर्वीच्या पुरुष शिक्षकांच्या बदल्या करून महिला



शिक्षिका नियुक्त केल्या. चपराशीसुद्धा महिला नियुक्त केल्या. सफाई कामगारही महिलाच होत्या. इथे लंडनला मुलामुलींना, विद्यार्थ्यांना शाळेतून घरी नेणाऱ्याचे ओळखपत्र असावे लागते. त्यांची नावे आधीच नोंदवलेली असतील तरच त्या व्यक्तीबरोबर मुलामुलींना पाठवतील. अन्यथा कुणाही येऱ्यागबाळ्याबरोबर मुलांना पाठवणार नाही. शाळेतील मुलामुलींची जबाबदारी ही सर्वस्वी मुख्याध्यापक, अध्यापकांची असते. आई-वडील आपल्या मुलांना मुख्याध्यापक, शिक्षकांच्या जबाबदारीवर शाळेत पाठवतात. त्यामुळे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी मुलामुलींच्या सुरक्षेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक, शिक्षक, चपराशी सफाई कामगार हे पुरुष नोकरदार नकोच. मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका, शिक्षिका महिला, चपराशी, सफाई कामगार महिलाच असाव्यात, असा सरकारने नियम करावा. मुलींची सुरक्षा फार मोठी महत्त्वाची जबाबदारी असून ती प्रत्येकाने पार पाडणे आवश्यक आहे.

**मीना खोंड**/७७९९५६४२१२

### अजून किती निर्भया?

२०१२ मध्ये त्यांनी तिच्यावर फक्त बलात्कारच केला नाही तर तिच्या आतड्या काढल्या. हे दिल्लीत होते आणि आम्ही तिचे नाव 'निर्भया' ठेवले. २०१७ मध्ये त्यांनी तिच्यावर फक्त बलात्कारच केला नाही तर तिला झाडावर लटकवले. हे उन्नावमध्ये होते आणि आम्ही नाव 'निर्भया-२' नाव ठेवले. २०१९ मध्ये त्यांनी तिच्यावर फक्त बलात्कारच केला नाही तर तिला जिवंत जाळले. हे हैदराबादमध्ये होते आणि आम्ही तिचे नाव 'निर्भया-३' ठेवले. २०१९ पर्यंत आपण मेणबत्त्या जाळणे, सोशल मीडियावर टिप्पणी करणे आणि आठवडाभरात विसरून जाणे एवढेच करत आहोत. दिवस निघून जातात आणि आमच्याकडे निर्भया तयार होतात. २०२४ मध्ये त्यांनी एका निवासी डॉक्टरवर क्रूरपणे बलात्कार करून हत्या केली. आम्ही चेंज म्हणून 'अभया' नाव ठेवले. बदलापूरमध्ये दोन चिमुकल्याचे लैंगिक शोषण झाले तर पोलिस प्रशासन ढिम्म राहते. लोक रस्त्यावर उतरले तर तत्परतेने पोलिस लाठीचार्ज करतात. आता फक्त मेणबत्त्या नव्हे तर अशा जघन्य अपराध्यांना जाळण्याची वेळ आली आहे. बलात्कार करणाऱ्यांना फाशीच्या शिक्षेचे विधेयक मंजूर करण्याची वेळ आली आहे. जेव्हा रातोरात चलन बदलले जाऊ शकते, जेव्हा राजकारण्यांचे पगार वाढवण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते, जेव्हा विश्वासदर्शक ठरावासाठी संसद रात्रभर उघडी राहू शकते तेव्हा बलात्काराविरुद्ध कडक कायदा करायला का विलंब होतोय, असा प्रश्न पडला आहे.

**रवी वाघमारे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### बदलापूर घटनेच्या निषेधार्थ निदर्शने

**परभणी,/प्रतिनिधी:** बदलापूर येथील एका शाळेतील चिमूकलीवरील अत्याचार प्रकरणात पोलिसांनी दाखविलेल्या दिरंगाईच्या निषेधार्थ शिवसेनेच्या (उबाठा) पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी बुधवारी (दि.२१) येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. जिल्हाप्रमुख विशाल कदम, जिल्हाप्रमुख संजय साडेगावकर, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक सौ. मंगल कथले, माजी सभापती गंगाप्रसाद आनेराव, माजी नगरसेविका सौ. अंबीका अनिल डहाळे, शिक्षक सेनेचे नेते बाळासाहेब राखे, सौ. सखुबाई लटपटे, मानवतचे शहर प्रमुख अनिल जाधव, सुरेश बनकर, उपजिल्हा संघटक सुरेखा टाले, शोभा इक्कर, गीता पुरी, अर्जून सामाले, संजय गाडगे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील पोलिस खात्याने दाखविलेल्या दिरंगाईमुळे त्याा मुलींच्या कुटूंबियांना मोठा त्रास सहन करावा लागला. त्याामुळे फडणवीस यांनी राजीनामा द्यावा व हे निष्क्रिय सरकार बरखास्त करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. दरम्यान, या आंदोलनकर्त्यांनी जिल्हा प्रशासनामार्फत राज्यपालांना निवेदन सादर करीत त्याा घटनेबाबत कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### युतीतून शिवसेनेस दोन जागा सुटाव्यात

**परभणी,/प्रतिनिधी:** आगामी विधानसभा निवडणूकीत या जिल्ह्यातील चार पैकी जागा महायुतीतून शिवसेनेच्या पदरात पडाव्यात या दृष्टीने पक्षश्रेष्टठींनी प्रयत करावेत, असा सूर शिवसेनेच्या (शिंदे गट) स्थानिक नेतेमंडळींनी खासदार रविंद्र वायकर यांच्यासमोर व्यक्त केला. शिवसेनेचे नेते तथा खासदार वायकर हे बुधवारी (दि.२०) परभणी व गंगाखेड या दोन मतदारसंघाच्या दौऱ्यानिमित्ताने देवगिरी एक्सप्रेसने मुंबईहून सकाळी परभणीत दाखल झाले. त्याावेळी त्यांचे रेल्वेस्थानकावर स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जोरदार स्वागत केले. खासदार वायकर यांनी बुधवारी दिवसभरात भास्करराव लंगोटे व राजू कापसे यांच्या निवासस्थानी तर जिल्हा प्रमुख व्यंकटराव शिंदे यांच्या खंडोबा बाजारातील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. तसेच माजी महानगरप्रमुख प्रविण देशमुख यांच्या निमंत्रणाप्रमाणे वसमत रस्त्यावरील श्री चिंतामणी मंदिरात दर्शन घेतले. देशमुख व समर्थकांद्वारे सत्कार स्विकारला. माणिकराव पोंढे यांच्या कार्यक्रमास हजेरी लावून माजी खासदार सुरेश जाधव यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. वायकर यांनी सावली या शासकीय विश्रामगृहावर पदाधिकारी व कार्यकर्त्यांबरोबर सायंकाळी संवाद साधला. त्यावेळी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी या जिल्ह्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, शिवसेनेवर विशेषतः धनुष्यबाणावर नितांत प्रेम केले आहे. त्याामुळे आगामी निवडणूकीत या जिल्ह्यातील किमान दोन मतदारसंघ शिवसेनेच्या हिश्यास यावेत या दृष्टीने प्रयतांची गरज आहे. श्रेष्ठींनी त्यासाठी दखल घ्यावी, असा सूर व्यक्त केला. दरम्यान, यावेळी महानगरप्रमुख नितेश देशमुख, गीता सुर्यवंशी, माजी नगरसेवक शेख शब्बीर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मनपात तीन सहाय्यक आयुक्तांच्या नियुक्त्या

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिकेंतर्गत मोठ्या प्रमाणावरील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या नगरविकास विभागाने बुधवारी परिविक्षाधीन मुख्याधिकारी म्हणून तीन सहाय्यक आयुक्तांच्या नियुक्त्याा केल्या आहेत.

नगरविकास खात्याने बुधवारी शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी गट-अ व मुख्याधिकारी गट-ब संवर्गातील उमेदवारांना ऑन फिल्ड ट्रेनिंग स्वरुपात नियुक्त्यांसंदर्भात स्वतंत्र अध्यादेश काढला आहे. त्याद्वारे परभणी महानगरपालिकेत श्रीमती प्रिया महादेव गोरखे, सोमनाथ रामचंद्र बनसोडे व प्रज्ञावंत जगन्नाथ कांबळे या तीघा परिविक्षाधीन मुख्याधिकारी गट ब यांची सहाय्यक आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. या नियुक्तीने महानगरपालिकेंतर्गत प्रभागांना हे सहाय्यक आयुक्त प्रमुख म्हणून लाभणार आहेत.

### लष्कर-ए-शिवबा मंडळाव्दारे दहिहंडी

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील लष्कर-ए-शिवबा मित्रमंडळातर्फे १ सप्टेंबर रोजी माखनचोर दहिहंडी फोड स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्व. गंगारामजी शिंदे यांच्या स्मरणार्थ या मित्रमंडळाद्वारे पद्माकर शिंदे, अजयराव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली १ सप्टेंबर रोजी वसमत रस्त्यावरील श्रीकृष्ण गार्डनजवळील मैदानावर माखनचोर दहिहंडी फोड स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या मंडळाद्वारे विजयी गोविंदा पथकांना भरघोस अशी बक्षीसे दिली जाणार आहेत. प्रथम विजेत्यास ४१ हजार रुपयांची चांदीची हंडी, द्वितीय विजेत्यास २१ हजार रुपये व तृतीय विजेत्यास ११ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

### वैज्ञानिक दृष्टिकोनातून एकात्मतेची भावना- डॉ.दि.भा.जोशी

**परभणी,/प्रतिनिधी:** आपले ध्येय हे आदर्श समाज निर्मितीची आहे त्यासाठी विवेकाचा आवाज बुलंद करू या आपल्या प्रगतीचे सामाजिक भान असले पाहिजे आणि त्याचा सन्मान केला पाहिजे. यातून आनंद प्राप्त होतो मनुष्याची प्रगती वैज्ञानिक मार्गाने व्हावी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून एकात्मतेची भावना निर्माण व्हावी यासाठी तरुणांनी जागृत होणे आवश्यक आहे. यातून राष्ट्राचा विकास होईल ही प्रेरणा नरेंद्र दाभोळकर यांच्या पुस्तकांमधून मिळेल आणि आदर्श समाजाची निर्मिती होईल असे प्रतिपादन नांदेड येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.दि.भा जोशी यांनी केले. मंगळवार दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समिती परभणी व समाजशास्त्र विभाग ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या पुस्तकांचा लोकार्पण सोहळा ज्ञानोपसक महाविद्यालय, परभणी येथे संपन्न झाला. अंधश्रद्धेतून जी क्रूरता निर्माण होते त्याला आमचा विरोध आहे यासाठी विज्ञानवादी विचार आचरणात आणावे असे आवाहन या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शेख मोहम्मद बाबर यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. संदीप पाटील, डॉ. परमेश्वर साळवे, प्राचार्य प्रल्हाद मोरे, मुंजाजी कांबळे, डॉ. अंबादास कदम उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल गवळे तर आभार प्रदर्शन डॉ. भास्कर गायकवाड यांनी केले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# शेवटपर्यंत जनतेची कामे करत राहणार- आ.साकोरे

**जिंतूर,/प्रतिनिधी:** कोणत्याही भागाचा विकास करण्यासाठी दूरदृष्टी ठेवून कामे केली पाहिजेत. ग्रामीण व शहरी भागाचा कायापालट करण्यासाठी पायाभूत सुविधा व नागरी प्रश्न सोडविणे आवश्यक असते. माय-बाप जनतेने त्यांच्या कामांसाठीच लोकप्रतिनिधीला निवडून दिलेले असते. विकास कामात राजकारण आणले तर, कोणतेच काम पूर्ण होऊ शकणार नाही. त्याामुळे शेवटपर्यंत जनतेचे कामे करत राहणार. सामान्य लोकांशी माझी नाळ जोडली गेली आहे, असे प्रतिपादन जिंतूरच्या आमदार मेघना बोर्डीकर यांनी केले.

तालुक्यातील वझर येथे आयोजित कामगार गृहोपयोगी वस्तू संच वाटप आ.बोर्डीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी त्याा बोलत होत्या. त्यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या योजनादूतच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पुढे आ. बोर्डीकर म्हणाल्या की, अंग मेहनत करून काबाडकष्ट करणाऱ्या कामगार बांधवांना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी येतील अशा वस्तू देऊन महाराष्ट्र शासनाने त्यांचा सन्मान केला आहे. त्याामुळे त्यांच्या कष्टाला मुद्देचा हात देताना मला विशेष समाधान वाटत आहे. आपल्या जिंतूर विधानसभा कार्यक्षेत्रात कोणताही कामगार बांधव या लाभापासून वंचित राहता कामा नये, याची दक्षता घ्यायला हवी. या वस्तू वाटप संचामध्ये विविध प्रकारचे गृहपयोगी साहित्या आहे. त्याची कामगारांना मदत होईल. तसेच त्यांना प्रोत्साहन सुद्धा मिळेल. त्याामुळे आपल्या भागातील जास्तीत-जास्त लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला पाहिजे, यासाठी प्रयत करणे गरजेचे आहे. दरम्यान, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम विभागाच्या वतीने




देण्यात आलेल्या या गृहोपयोगी वस्तू संचाचे शेकडो लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी मा.जि.प.सदस्य भगवान वटाणे,सुमील मते,गजानान व्हाड,केशव घुले,प्रकाश गोरे,सचिन आढे,माऊली मार्कड,बाळासाहेब मते,अक्षय वटाणे,लाभार्थी कामगार बंधू आणि भगिनी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गौतम बुध्दांनी जगाला अहिंसा आणि प्रेमाचा मार्ग सांगितला- आ.डॉ.गुट्टे

**पूर्णा/ प्रतिनिधी-** जगातल्या सर्व महापुरुषांनी सामाजिक परिवर्तन आणि प्रबोधनासाठी कार्य केले. तत्कालिन काळात विविध विसंगतीत अडकलेल्या समाजाला दिशा दिली. अगदी संत महात्म्यांनी सुध्दा तीचं परंपरा पुढे नेली. मात्र, त्याामध्ये तथागत गौतम बुद्धांचे मोठे योगदान आहे. कारण, त्यांनी जगाला अहिंसा आणि प्रेमाचा मार्ग सांगितला, असे प्रतिपादन गंगाखेडचे रासप आ.डॉ.रताकर गुट्टे यांनी केले.
शहरातील बुध्द विहार येथे आयोजित धम्मदेसना कार्यक्रमात ते बोलत होते. श्रावण पौर्णिमा निमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बुध्द धर्मातील विविध प्रार्थना, धम्मसंदेश घेण्यात आले.
पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, बौद्ध समाजात जन्माला आलेला माणूस जन्माने नव्हे तर जगण्याने बौद्ध असतो. कारण, त्याने बौध्द धर्म, विचार, संस्कृती आणि परंपरा स्विकारलेली असते. त्याामुळे तथागत गौतम बुद्ध यांचा विचार आजही जगाला मार्ग दाखवणारा ठरतो आहे.
बौद्ध धर्माचे संस्थापक तथागत भगवान गौतम बुद्धांनी दुःखाचे मुळ शोधून काढले. तसेच त्यावरचा उपाय देखील सांगितला. प्रज्ञा, शिल आणि करुणा ही त्रिसूत्री अंगिकारली तर जीवन सुखकर होईल, असे त्यांनी सांगितले. जगात सर्वांत मोठ्या चार धर्मांमध्ये आज बौद्ध धर्माचा समावेश आहे. कारण, बुध्दांनी तसे अधिष्ठान दिले आहे. द्वेषाचा अंत द्वेषाने होत नाही. तर प्रेमाने द्वेष संपतो. हेही त्यांनी सिद्ध केल्याचे, आ.डॉ.गुट्टे यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भन्ते डॉ.उपगुप्त महाथेरो, तालुकाध्यक्ष गणेश कदम, सभापती बालाजी रुद्रवार, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष मुकुंद भोळे, प्रशांत कापसे, विश्वनाथ होळकर, व्यंकटराव मोरे, अनिल कांबळे यांच्यासह उपासक, उपासिका तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परभणीतील दुर्दैवी चित्र : मनपासह पोलिसांचे दुर्लक्ष**

## विक्रेत्यांकडून भोंगे लावले अन् वाढले डोकेदुखीचे आजार

**परभणी,/प्रतिनिधी-** गेल्या काही महिन्यांपासून मध्यवस्तीसह चोहोबाजूंच्या वसाहतीतील प्रमुख चौक व प्रमुख रस्त्यांवर विक्रेत्यांनी भोंगे लावून भाजीपाल्यासह फळ व अन्य वस्तूंच्या विक्रीचा नवा फंडा अवलंबविल्याने व्यापारीपेठांसह वाहनधारक व सर्वसामान्य नागरीक अक्षरशः हैराण झाले आहेत.



संपूर्ण महानगरातील प्रमुख चौक व रस्ते आधीच अरुंद आहेत. त्त्याा चौकांसह रस्त्यांची अवस्था अक्षरशः भयावह आहे. जागोजागी खड्डे, त्याा खड्ड्यांमधून पाणी, तुंबलेल्या नाल्या, त्याा नाल्यांचे रस्त्यावरुन वाहणारे पाणी, रस्त्याा रस्त्यांवर कचऱ्यांचे ढीग, त्यातून दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव, सकाळपासून संध्याकाळपर्यंत उठणारे धुळीचे लोळ हे चित्र सर्वसामान्य नागरीकांच्या अंगवळणी पडले आहे. वर्षानूवर्षापासून या स्थितीत कोणताही बदल होत नाही. महानगरपालिका असो, शहर वाहतूक पोलिस यंत्रणा त्याकडे ढुंकूनसुध्दा पहावयास तयार नाही. त्याामुळे कारवाईचा तर प्रश्नच उद्भवत नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी असो, सत्तारुढ व विरोधी पक्षाचे नेते असो ते जणू हे आपलं कामच नाही या अविर्भावात वावरत आहेत. त्याचा परिणाम शहरवाशीयांचे प्रश्न सुटण्याऐवजी दिवसेंदिवस चिघळत आहेत. वर्षानूवर्षापासून प्रमुख चौक व प्रमुख रस्त्यांवर मोक्याच्या ठिकाणी, अक्षरशः रस्त्यांवरसुध्दा ठाण मांडून बसलेल्या विक्रेत्यांनी गेल्या काही महिन्यांपासून ग्राहकांचे लक्ष वेधण्याकरीता नवनवीन फंडे अवलंबविले आहेत. विशेषतः लाऊडस्पिकर लावून भाजीपाला, फळे, रेडिमेड कपडे, लेदर बॅग, ईलेक्ट्रीक वस्तू किंवा अन्य काही सामानांच्य विक्रीचा फंडा अवलंबविला आहे. सकाळपासून सायंकाळी उशीरापर्यंत हे विक्रेते रॅकॉर्डींगद्वारे लाऊडस्पिकरवर मोठ मोठ्या आवाजात ग्राहकांचे लक्ष वेधण्याचे प्रकार करीत असून या विक्रेत्यांचे हे भोंगे वाहनधारकांसह सर्वसामान्य नागरीकांसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरले आहेत. व्यापारी पेठांमध्ये, नागरी वस्त्यांमधील विक्रेत्यांच्या या अनाधिकृत भोंग्यांविरोधात जागरुक नागरीकांनी, व्यापाऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर वाद-विवादाचे प्रकारसुध्दा वाढले आहेत. त्यातून ताण-तणाव निर्माण होतो आहे.
मध्यवस्तीत जूना मोंढा, नटराज रंग मंदिर परिसर, शनिवार बाजार, छत्रपती शिवाजी चौक, गुजरी बाजार, गांधीपार्क, क्रांती चौक, अष्टभूजा चौक, कडबी मंडी, नवा मोंढा, आर.आर. टॉवर चौक,
जिल्हा परिषद इमारत, प्रशासकीय इमारत कॉर्नर, राजगोपालाचारी उद्यान, बसस्थानक, डॉक्टर लेन व वसमत व जिंतूर रस्त्यावर भोंगे लावून मालाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे.



**परभणी- शिवसेना जिल्हा पक्षनिरीक्षक तथा खा.रविंद्र वाईकर हे परभणी दौऱ्यावर आले अंसताना त्यांनी वसमत रस्त्यावरील श्री. चिंतामणी मंदिर येथे महाराजांचे दर्शन घेतले. याप्रसंगी खा.वाईकर यांचे स्वागत करतांना शिवसेना महानगरप्रमुख प्रविण देशमुख, धैर्यशील कापसे पाटील, बाळासाहेब पानपट्टे, नितेश देशमुख, भास्करराव लंगोटे, विजू शेळके, धनराज चव्हाण, शेख शब्बीर, गीता सुर्यवंशी व शिवसैनिक दिसत आहेत.**

## राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**परभणी / प्रतिनिधी-** दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी -कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली.
अपर जिल्हाधिकारी डॉ. काळे यांनी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. ''जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गानी सोडविण्याची'' प्रतिज्ञा अपर जिल्हाधिकारी डॉ. काळे यांनी यावेळी उपस्थितांना दिली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून महायुती सरकारचा निषेध

**जिंतूर ,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र सह देश भरात भाजप व युती सरकारच्या काळात चिमुकल्या मुली, युवती, महिला यांचे लैंगिक अत्याचार केसेस वाढल्या आहेत त्याच पार्श्वभूमीवर युती सरकारचा जाहीर निषेध करत उध्दव बाळासाहेब ठाकरे गट शिवसेना पक्षाच्या वतीने परभणीत विराट आक्रोश मोर्चा काढून सरकार चे धिक्कार करत प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लोकसभा क्षेत्रात शाळेतील साडे तीन वर्षीय चिमुरडीवर एका नराधमाने अत्याचार केले तर एका शिक्षकाने अकोला येथे शाळेंत अल्पवयीन मुलींचे विनयभंग केला व राज्यात इतर अनेक ठिकाणी महिला अत्याचाराच्या घटना सर्रास घडत आहेत.

त्याामुळे महाराष्ट्रातील मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात कायदा व सुव्यवस्था विस्कळित झाली असल्याने कायद्याची भीती या नराधमांना नसल्याचेच चित्र दिसत आहे त्याामुळे दिवसेंदिवस राज्यात महिला अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे म्हणून उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने परभणीत विराट आक्रोश मोर्चा काढून सरकार चा धिक्कार करत जाहीर

**शिवसेना गटाचा परभणीमध्ये आक्रोश आंदोलन**




निषेध नोंदवण्यात आला. तसे निवेदन जिल्हाधिकारी यांना सुपूर्द करण्यात येवुन लवकरात लवकर या नराधम दोषींवर कठोर कारवाई करावी व राज्यात महिला माता भगिनी यांना न्याय देण्यात यावा यासाठी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाला निवेदन देण्यात आले यावेळेस उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख विशाल जी कदम, डॉक्टर विवेक नावंदर, संजय जी साडेगावकर, मंगल ताई कथले, पंढरीनाथ घुले पाटील, गंगाप्रसाद आनेराव, अनिल जाधव, सुरेश बनकर, अंबिका डहाळे, सुरेखा जी शेवाळे टाले, शोभा ईक्कर, गीता पुरी अनेक पदधीकारी महिला व युवकांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची कृषिमंत्री धनंजय मुंडेंकडून पाहणी

**साडेतीन तास कृषीमंत्री रमले स्टॉल्स पाहण्यात, ३३५ स्टॉल्सला भेटी । शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक बाबी उपलब्ध, शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा – धनंजय मुंडे**




**परळी वैद्यनाथ । त भा वृत्तसेवा**
राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रथमच परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव अंतर्गत भरवण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन समारंभ संपल्यानंतर भेट देऊन पाहणी केली.

## जिल्हयातील शेतकऱ्यांनी पाहिली ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके

कृषी क्षेत्रात लागलेले नवनवीन शोध, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन आधुनिक अवजारे यांसह विविध शेती उत्पादने आदींची शेकडो दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली असून नॅनो खतांची ड्रोन द्वारे फवारणी करण्याची प्रात्यक्षिके सुद्धा येथे दाखवण्यात येत आहेत. या स्टॉल्सला भेटी देण्यामध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे हे तब्बल साडेतीन तास रमले होते. जवळपास ७.३० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत त्यांनी जवळपास ३३५ स्टॉल्सला भेटी देऊन पाहणी केली व त्यांच्याकडील उत्पादनांची व तंत्रज्ञानाची माहिती घेतली. चारही कृषी विद्यापीठाचे स्टॉल्स या ठिकाणी उभारले असून, तेथील उपक्रमांचीही मुंडेंनी माहिती घेतली.
या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या स्टॉलसमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्यासाठी आणि शेतीमध्ये अधिक समृद्धी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व लाभ मिळवावा, असे आवाहन याप्रसंगी धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक श्री.मुळे, आत्माचे जिल्हा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांसह अधिकाऱ्यांनी श्री मुंडे यांना माहिती दिली. प्रसंगी पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.
यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, त्यालाही शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पुढील चारही दिवस अविरत सुरू राहणार आहे.
स्टॉल ठिकाणीच धनंजय मुंडे यांचा नाश्ता काल सकाळपासूनच कार्यक्रमाची लगबग होती. सायंकाळी उशिरापर्यंत जेवणालाही वेळ मिळाला नाही, त्यामुळे सायंकाळी स्टॉल पाहत असतानाच धनंजय मुंडे यांनी स्टॉलवर असलेले विविध मिलेटपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, फळे यांचा शेतकऱ्यांच्या सोबत आस्वाद घेतला.

## नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचा बीड येथे उद्या रौप्य महोत्सवी सोहळा



**बीड । त भा वृत्तसेवा**
नागरी सहकारी बँकेचा विकास साधण्यासाठी बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि. बीडची स्थापना झाली, त्यास २५ वर्ष पूर्ण झाले आहेत, त्या प्रित्यर्थ शनिवार २४ ऑगस्ट रोजी 'रौप्य महोत्सव समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत माँ वैष्णव पॅलेस एमआयडीसी बीड येथे साजरा होत आहे.
बीड शहरातील शिवाजी नगर येथील छत्रपती शाहू बँक शिवाजीनगर शाखा अर्जुन भवन येथे गुरुवारी दि.२२ रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली. बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया यांनी माहिती दिली. यावेळी छत्रपती शाहू बँकचे अध्यक्ष अजय जाहेर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. ई. पवार उपस्थित होते.
बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया म्हणाले, सुशासन आणि अनुपालन ,नागरी सहकारी बँके पुढील आव्हाने, गव्हर्नर आरबीआय यांनी नागरी सहकारी बँक संदर्भात सांगितलेल्या मुद्द्याबाबत मार्गदर्शन. संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्तरदायित्व व कर्तव्य या आणि अशा विविध विषयावर मार्गदर्शन या रौप्य महोत्सव समारंभाच्या निमित्ताने होणार आहे. भारतीय रिझर्व बँकेचे संचालक सतीशजी मराठे, दि महाराष्ट्र अर्बन को ऑफ बँक फेडरेशन लि मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा. दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि मुंबईचे अध्यक्ष विश्वास ठाकूर, दि नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन बँक दिल्लीचे संचालक सुनील देवडा, संचालक दिलीप चव्हाण, मुकुंदकुमार कळमकर या मान्यवर प्रमुखांची उपस्थिती रौप्य महोत्सव समारंभाच्या निमित्ताने राहणार आहे.बँकिंग क्षेत्रातील सर्वांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास शनिवारी सकाळी १०:३० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया, उपाध्यक्ष ड. मकरंद पत्की, सचिव भगवान पवार यांनी केले आहे.

# सर्व शाळांना सीसीटीव्ही बसवणे व कर्मचारी नियुक्तीपूर्वी चारित्र्य पडताळणी बंधनकारक

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत शासन निर्णय जारी

बीड । त भा वृत्तसेवा
बदलापूर येथील पाशवी घटनेनंतर राज्याचा शालेय शिक्षण विभाग ताळ्यावर आला आहे. आता शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना लागू केल्या आहेत. यात प्रामुख्याने शाळा व परिसरात सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने काही अनुचित घटना घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.शालेय विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजनासंदर्भात शासनस्तरावरून वेळोवेळी आदेश काढण्यात आले होते. विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने, या उपाययोजनांशी तडजोड करता येणार नाही. या बाबतचे आदेश अवर सचिव प्रमोद पाटील यांनी जारी केले आहेत.
सर्व खासगी शाळांनी एका महिन्यात शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पायाभूत सुविधांचे निर्माण या घटकांतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पाच टक्के प्रमाणात राखीव ठेवण्यात आलेल्या निधीचा वापर



करता येणार आहे. शाळा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज ठराविक अंतराने तपासणे आवश्यक असून अशा फुटेजमध्ये आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर योग्य कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापकांची आणि सर्वसाधारणपणे शाळा व्यवस्थापन समितीची असेल.अन्यथा संबंधित शाळांचे अनुदान रोखणे अथवा शाळेची मान्यता

## निर्णयाच्या उपाययोजने करिता पारदर्शकता आणि नियोजनाची गरज – मनोज जाधव

**अनेक शाळांमध्ये विज जोडणी चा अभाव आहे. अशात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्याचा उपयोग होणार नाही. याकरिता देखील उपाययोजना करणे गरजेचे आहे.**

रद्द करण्याच्या कारवाईचा अवलंब करण्यात येणार आहे. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांनी प्राधान्याने कॅमेरे बसविण्याबाबत कार्यवाही करावी.
शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीपूर्वी चारित्र्य पडताळणी
शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना काळजी घ्यावी लागणार असून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.सुरक्षारक्षक, सफाईगार, मदतनीस, स्कूल बसचे चालक आदी बाबतीत संबंधित व्यक्तीच्या पार्श्वभूमीची काटेकोर तपासणी शाळा व्यवस्थापनामार्फत होणे आवश्यक आहे.यासाठी नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणेकडे द्यावी लागणार आहे.
घटना दडविल्यास कारवाई
शाळेमध्ये विद्यार्थ्यासोबत अनुचित प्रकार घडल्याचे उघड झाल्यानंतर संबंधित शाळा व्यवस्थापन, संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सदर बाब चोवीस तासाच्या आत संबंधित शिक्षणाधिकारी यांना कळवावी. अशी अनुचित घटना कोणत्याही प्रकारे दडवून ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचे निर्दशनास आल्यास, संबंधित व्यक्ती, मुख्याध्यापक, संस्था यांच्यावर कारवाई होणार आहे.
शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्याचे बंधन, सखी सावित्री समिती स्थापन होणार, कर्तव्यात कसून केल्यास मुख्याध्यापकावर शिस्तभंगाची कारवाई, महिला कर्मचारी यांच्या नियुक्तीला प्राधान्य, सीसीटीव्ही फुटेज आठवड्यातून तीन वेळा तपासावे लागेल

## गोकुळ शिशुवाटिकेत वृक्षला राखी बांधून रक्षाबंधन



बीड । तभा वृत्तसेवा
।।सण हा मांगल्याचा सण हा प्रेमाचा, सण हा बहिण भावाच्या अतूट नात्याचा सण हा रक्षाबंधनाचा।।
दीनदयाल शोध संस्थान संचलित, गोकुळ शिशुवाटिकेत वृक्षाला राखी बांधून राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृतीत प्रमुख सणांमध्ये रक्षाबंधन हा भाऊ बहिणीच्या स्नेह व अतूट बंधनाचा सण म्हणून साजरा केला जातो. हे वर्ष आम्ही पर्यावरण पूरक वर्ष म्हणून राबवतोय त्या निमित्ताने झाडाला राखी बांधण्यात आली व विद्यार्थ्यांना झाडाची पाने फुले तसेच कागदाच्या पेपर पासून राखी तयार करणे हा एक अनोखा उपक्रम घेतला. सर्वप्रथम सर्व गटातील मुलांना गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ स्नेहलताई देशपांडे यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले. व वृक्षाला राखी बांधून राखी पौर्णिमेला सुरुवात केली. त्यानंतर मुलांना व मुलींना कुंकू लावून औक्षवण करण्यात आले. व मुलगा व मुलगी हा भेदभाव न ठेवता मुलांनी मुलींना व मुलींनी मुलांना राख्या बांधण्यात आल्या. मुलांनी मुलींना वेगवेगळे खाऊ व भेटवस्तू दिल्या. त्यामध्ये स्वच्छंद गटातील देवांश लोमटेच्या पालकांनी स्वइच्छेने सर्व मुलांसाठी खाऊ दिला.

## डॉ.अरविंद देशपांडे यांचे निधन

केज । त भा वृत्तसेवा
तब्बल दोन दशके केज तालुक्यातील रुग्णांची सेवा करून 'विश्वासू डॉक्टर' म्हणून केजवासीयांच्या हृदयात कायमचे स्थान मिळवणारे प्रसिद्ध डॉक्टर ए बी देशपांडे यांचे वृधोपकाळाने गुरुवारी दुपारी अंबेजोगाई येथे



वयाच्या ८२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.
डॉ ए बी देशपांडे साहेब यांनी १९९५ ते २०१४ या काळात केज मध्ये प्रदीर्घ रुग्ण सेवा केली. केजच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमातही त्यांचा मोठा सहभाग असायचा. त्यांच्या उत्कृष्ठ रुग्णसेवेसाठी केज रोटरीने 'केजभूषण'
त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच केज शहरातुन हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर शुक्रवारी सकाळी ८ वाजता अंबेजोगाई येथील योगेश्वरी मंदिर परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडणार आहेत.

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरपाई द्या

### आ.संदीप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी

बीड । त भा वृत्तसेवा
बीड मतदारसंघातील बीड व शिरूर का. तालुक्यात मागील दोन दिवसात जवळपास सर्वच महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे, पशुधनाचे, घरांचे व गायगोठ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून शेतकर्यांना नुकसान भरपाई द्या अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन आणि प्रशासनाकडे केली आहे.



बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड तालुका आणि शिरूर का. तालुक्यात जवळपास सर्वच महसूल मंडळात दि.१९ आणि दि.२० रोजी अतिवृष्टी झाली आहे. या झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील ऊस, कापूस, सोयाबीन, मूग, बाजरी आदी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. यासोबतच पशुधनाची हानी, घरांचे व गायगोठ्यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतातील उभे पीकांचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदील झाला असून त्याला मदत करण्याची गरज आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ तसेच जिल्हाभरात, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक यांना आदेशित करून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे. तसेच शासनस्तरावरून शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

## डॉ.ए.बी.देशपांडे यांचे दु:खद निधन

अंबाजोगाई । त भा वृत्तसेवा



अंबाजोगाई शहरातील सुप्रसिद्ध ज्येष्ठ फिजिशियन डॉ. ए. बी. देशपांडे यांचे आज सकाळी अंबाजोगाई येथे दुःखद निधन झाले.
डॉ.अरविंद भगवंतराव (ए.बी.) देशपांडे हे वरिष्ठ चेस्ट फिजिशियन आणि सेवानिवृत्त वैद्यकीय अधीक्षक होते. ते बराच काळ महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य सेवांमध्ये होते आणि त्यांना शहरी आणि ग्रामीण आरोग्य वितरण प्रणालीच्या संपर्कात राहण्याची संधी मिळाली. ते 'समाज जोत' आणि 'समाज भूषण' पुरस्कारांचे प्राप्तकर्तेही होते भारतात क्षयरोग नियंत्रण शक्यता आणि आव्हाने. या विषयावर त्यांनी विशेष संशोधन केले.त्यांचा क्लिनिकल अनुभव, चांगले संवाद कौशल्य, योग्य इतिहास यामुळे त्यांनी रुग्णांवर योग्य उपचार केले रुग्ण सेवेशी समर्पित व्यक्तिमत्व आज लोप पावले. अंत्यसंस्कार उद्या सकाळी बोरुळ तलाव स्मशानभूमी येथे होणार आहे त्यांच्या पश्चात दोन मुले, सूना, नातवंडे,असा परीवार आहे.स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.जितेंद्र देशपांडे, जिल्हा न्यायाधीश गिरीश देशपांडे यांचे वडील होते.

# आता राज्यात लाडका शेतकरी अभियान –मुख्यमंत्री शिंदे

बीड । त भा वृत्तसेवा
लाडकी बहीण व लाडका भाऊ नंतर आता आपला अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याच्या लाभाच्या सर्व योजना राबवून लाडका शेतकरी अभियान राज्यात सुरु करण्यासोबतच सोयाबीन व कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्यातील ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केली.
परळी येथील स्व. पंडीतअण्णा मुंडे सभामंडप कृषि उत्पन्न बाजार समिती येथे एका दिमाखदार सोहळ्यात पाच दिवसीय कृषि महोत्सव २०२४ चे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमास व्यासपीठावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल तसेच विधानपरिषद सदस्या आमदार पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आला. तसेच सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अनुदान वितरीत करण्यासाठी वेबपोर्टलही मान्यवरांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. कृषि विभागाच्या विविध योजनांच्या माहितीचा समावेश असलेल्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच परभणी येथील वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन पुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.
पाच दिवसीय चालणाऱ्या या कृषि महोत्सवात कृषि साहित्य प्रदर्शनासोबतच पशुप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत येणाऱ्या पाच दिवसात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्र होणार आहे. तसेच याठिकाणी धान्य महोत्सव, रानभाजी महोत्सव होणार आहे. प्रदर्शनात महिला बचतगटांसाठी साहित्य विक्रीची दालने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कृषि अवजारांचा स्वतंत्र विभाग देखील याठिकाणी आहे. या पाच दिवसीय महोत्सवाला किमान पाच लाख शेतकरी भेट देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.
राज्यातील सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीच्या काळात हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला. गतवर्षी सोयाबीन, कापूस पिकाला कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी पाच हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. यासाठी आवश्यक ई–पीक पाहणी अहवाल अनेक शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे निर्दर्शनास आले असल्याने आता ई–पीक पाहणी अहवालाची अट शिथिल करून सातबारा उताऱ्यावरील नोंदीनुसार अनुदान वाटप करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासोबतच लाडक्या भावांना विद्यावेतन देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली. आता याच धर्तीवर विविध लाभांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लाडका शेतकरी अभियान सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. याची सुरुवात आज नमो शेतकरी महासन्मान योजनेचा दोन हजार रुपयांचा चौथा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून होत असल्याचे त्यांनी सांगीतले. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. 'कष्टकरी, वारकरी आणि सुखी शेतकरी' हेच शासनाचे धोरण असून राज्यातील कांदा, सोयाबीन, कापूस आणि दुधाला योग्य मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांच्या सक्षमीकरणामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी सुरु राहणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. तसेच कृषि क्षेत्रातील नवीन बदलांची माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी, आधुनिक शेतीला चालना मिळून राज्यातील कृषि क्षेत्राचा विकास होण्यासाठी कृषि महोत्सव उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि त्यांना सन्मान मिळवून देणारी असल्याचे नमूद करून ही योजना सुरु केल्याबद्दल केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्य शासनाचे अभिनंदन केले. राज्यातील शेतकऱ्यांना केंद्रात न्याय मिळवून दिला जाईल, असे सांगून ते म्हणाले की, केवळ १ रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ देणारे आणि प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजना राबवून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील सोयाबीन, कापूस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाचा योग्य दर मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे कृषिमंत्री श्री. चौहान म्हणाले.


### 'राज्यस्तरीय कृषि महोत्सव'चे दिमाखदार उद्घाटन

मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. समुद्रात वाहून जाणारे ५० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची योजना अंतिम टप्प्यात असून बीड जिल्ह्यातील आष्टीपर्यंत लवकरच हे पाणी येईल. यासाठी मराठवाड्याचे हक्काचे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सुमारे ११ हजार कोटींची कृष्णा–भीमा स्थिरीकरण योजना हाती घेण्यात आली आहे. ११ सिंचन प्रकल्पांसाठी १३ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातून शेतकऱ्यांना विविध बाबींचा लाभ देण्यासाठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. तसेच जायकवाडी प्रकल्पाच्या टप्पा–२ साठी ५३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून माजलगाव कालव्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यामुळे मराठवाड्यातील ८५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष दूर होवून शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी गती देणारी ठरेल असे त्यांनी सांगितले.
सर्वसामान्य गरीब नागरिक हा केंद्रबिंदू मानून राज्य शासन विविध योजनाची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. त्यानुसार राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून जवळपास सव्वाकोटी माता–माउलींच्या खात्यात योजनेची रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच गरीब कुटुंबातील मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून महिलांना दरवर्षी तीन मोफत गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. त्यामुळे ५२ लाख कुटुंबांना लाभ होणार आहे. सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेचा लाभ मिळणार असून शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज मिळेल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तसेच अवर्षणप्रवण भाग असलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषि महोत्सवात शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळणार असून त्यांचे उत्पन्न वाढीसाठी हा महोत्सव उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले.
शेतकऱ्यांना कृषि क्षेत्रात होत असलेल्या क्रांतीची, नवीन बदलांची माहिती मिळावी, यासाठी कृषि विभागाने राज्यस्तरीय कृषि महोत्सवाचे आयोजन केले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार केला जात आहे. ड्रोनद्वारे फवारणी, नॅनो युरिया, नॅनो डीएपी वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च जवळपास ३० टक्केने कमी होवून उत्पन्नात २० टक्के वाढ होईल, असा विश्वास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.
विधानपरिषद सदस्य पंकजा मुंडे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकामध्ये कृषि आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी राज्यस्तरीय कृषि महोत्सवाबाबत माहिती दिली. पाच दिवसीय कृषि महोत्सवात शेतकऱ्यांना नवनवीन प्रयोगांची माहिती देण्यासाठी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले असून ४०० पेक्षा अधिक दालनांतून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, प्रयोगांची माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.
प्रारंभी महिला आणि शेतकऱ्यांच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांचा एकत्रित हार घालून सत्कार करण्यात आला. तसेच बैलबंडी भेट देण्यात आली.
या कार्यक्रमास व्यासपीठावर आमदार विक्रम काळे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार टी.आर. जिजा पाटील, माजी आमदार सुरेश धस, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांनी आभार मानले.
हेलिपॅडवर स्वागत
कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथींचे येथील थर्मल कॉलनी हेलिपॅडवर आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. प्रशासनातर्फे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.
तत्पूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे एकाच हेलिकॉप्टरने आगमन झाले. त्यांच्यासमवेत आमदार पंकजा मुंडे या देखील होत्या. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचेही हेलिपॅडवर प्रशासनातर्फे स्वागत करण्यात आले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सन २०२३ ची पोर्टलद्वारे पीक पाहणीची अट रद्द करून सरसकट ५ हजार मदत द्या

## भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

खरीप हंगाम सन २०२३ मध्ये बहुतांश भागात कमी पाऊस झाल्यामुळे तसेच सोयाबीन आणि कापसाचे भाव पडल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्याअनुषंगाने झालेल्या नुकसानीसाठी शासनाने शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५ हजार रूपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयात शासनाने ई-पीक पाहणी पोर्टलद्वारे पिकांची नोंदणी केलेले शेतकरी सदर अनुदानास पात्र राहणार असल्याची जाचक अट घातल्याने हिंगोली जिल्ह्यासह हिंगोली विधानसभा मतदारसंघातील मोठ्या प्रमाणात शेतकरी सदर अनुदानापासून वंचीत राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे ही अट रद्द करून सन २०२३ खरीप हंगाम अनुदानासाठी पीक पाहणी पोर्टलद्वारे पिकांची नोंदणी करण्याची अट रद्द करून सरसकट शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५ हजार रूपये आर्थिक मदत देण्याची मागणी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे पत्राद्वारे केली आहे.

**गावांना भेटी दरम्यान अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी– आ. मुटकुळे**

हिंगोली विधानसभा मतदारसंघात अनेक गावांना भेटी देत असतांना अनेक गावांतील शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी पोर्टलबाबत तक्रारी केल्या आहेत. कधी सर्वर डाऊन तर कधी नेटवर्कच्या समस्या असल्यामुळे खरीप हंगाम २०२३ ची ई-पीक पाहणी पोर्टलवर नोंदी करण्यासाठी अडथळे निर्माण झाले आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊनही त्यांना पोर्टलच्या समस्येमुळे प्रक्रिया पूर्ण करता आली नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी केली होती. महायुती सरकार आमच्या मागणीची निश्चित दखल घेऊन शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी पाच हजार रूपये मदत करेल असा विश्वास भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केला आहे.

हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी सिंचन विहीरी तसेच वीज प्रश्न सोडविण्यासाठी वीज केंद्र उपलब्ध करून द्यावीत या मागणीसाठी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी नुकतीच राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेतली. त्यानंतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२३ अनुदान सरसकट मिळावे तसेच ई-पीक पाहणीची अट रद्द करावी या मागणीसाठी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले. त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यासह हिंगोली विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात डोंगराळ भाग आहे. सदर ठिकाणी नेटवर्क नसल्याने तसेच पोर्टलचे सर्वर सतत डाऊन असल्याने जवळपास ३० ते ४० टक्के शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी झालेली नाही. तसेच ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केलेली आहे. त्यामधील १० टक्के शेतकरी यांची नावे अनुदानाच्या यादीत समाविष्ट झालेली नसल्यानचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे हिंगोली विधानसभा मतदारसंघात जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात शेतकरी अनुदानापासून वंचीत राहणार असल्याने शेतकऱ्यांमधून प्रचंड रोष व्यक्त होत आहे. त्यामुळे हिंगोली विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील वरील परिस्थिती पाहता ई-पीक पाहणी पोर्टलद्वारे पिकांची नोंदणी करण्याची अट रद्द करून सरसकट शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५ हजार रूपयांची मदत देणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या स्तरावरून ई-पीक पाहणी पोर्टलद्वारे पिकांची नोंदणी करण्याची अट रद्द करून सरसकट शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५ हजार रूपये मदत देण्याची मागणी पत्रात करण्यात आली आहे.

# नागनाथ मंदिर मार्ग अतिक्रमण मुक्त करण्याची मागणी

## औंढा नागनाथ नगर पंचायतीचे दुर्लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २२ ऑगस्ट**

नागनाथ मंदिराच्या कमानीपासून मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंतचा संपूर्ण रस्ता अतिक्रमण करून व्यापला गेला आहे. या रस्त्यावर सर्व प्रकारच्या व्यवसायिकांचे दुकाने आहेत. त्यामुळे भाविकांना तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तत्काळ मंदिराकडे जाणारा मार्ग अतिक्रकमण मुक्त करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

मंदिर मार्गावर अतिक्रमण करून कपडा व्यापारी, हॉटेल चालक तसेच फर्निचर आदी प्रकारचे दुकाने असून दुकानांसमोर दिवसभर वाहने विखुरलेल्या अवस्थेत उभी केल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यातच अनेक टपरीधारक तसेच या रस्त्यावरील अनेक ठेलेधारक गाडी लावून आणखीनच जास्त गर्दी करीत आहेत. इलेक्ट्रिक खांब मधोमध आल्याने त्याचीही अडचण इतर वाहनांना होत आहे. शिवाय अटो, जीप सारखी वाहने या रस्त्याने सतत ये-जा करत असतात इथे वाहनांची तारांबळ उडाल्याचे दिसून येत आहे. मोठ्या दुकान धारकांनाही या वाहनांचा त्रास होत आहे परंतु कोणीही कोणाला याबाबत बोलत नसल्याचे दिसून येत आहेत. औंढा नगरपंचायतीकडून सदर मार्ग अतिक्रमण मुक्त करण्याची मागणी औंढा येथील जनतेकडून होत आहे.

शिवाय नवीन बस स्थानक ते पोलीस स्टेशन पर्यंत चा रस्तासुध्दा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला आहे. अनेकांनी दुकाने थाटले आहेत. त्यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजन करण्याची युवक काँग्रेसची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

परिसरात आणि राज्यात महिला तसेच अल्पवयीन मुली यांच्यावर अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. या घटनांवर आळा घालण्यासाठी जिल्ह्यातील महत्वाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे युवक काँग्रेसच्यावतीने करण्यात आली आहे.

निवेदनात महिलांची सुरक्षितता समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. अलिकडच्या काळात महिलांची होणारी छेडछाड, ईव्ह टीझींग आणि हिंसक घटनांमुळे महिला, विद्यार्थीनी, अल्पवयीन मुली यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: विद्यार्थीनी, कामकाज करणाऱ्या महिला यांना रात्रीच्यावेळी प्रवास करतांना असुरक्षितता जाणवू लागली आहे. या परिस्थितीमुळे त्यांचे दैनंदिन जीवनच नाही तर शहराच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात त्यांचा सहभाग कमी होत आहे. या घटनांवर आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि पोलिस प्रशासनाच्यावतीने उपाययोजना करण्यात याव्यात. त्यामध्ये छेडछाड आणि इतर गुन्ह्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या परिसरांमध्ये पोलिसांची गस्त वाढवावी, बस स्थानक, बाजारपेठा, रेल्वे स्थानक तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, आपत्कालीन हेल्पलाईनबद्दल महिलांमध्ये जनजागृती करून त्याचा वापर कसा करायचा याबद्दल माहीती देण्यात यावी, महिला, मुली यांना स्वसंरक्षण करण्यासाठी स्वसंरक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे, महिलांकडून येणाऱ्या तातडीच्या फोन कॉल्सना त्वरीत प्रतिसाद देणारे त्वरीत प्रतिसाद संघ स्थापन करावेत, या संघांना प्रभावीपणे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदनावर युवक काँग्रेसचे अध्यक्ष बालाजी करडीले, उपाध्यक्ष विठ्ठल मोहनकर, यश देशमुख, अक्षय डाखोरे, विठ्ठल जाधव, अख्तर पठाणे, साद पठाण, गणेश मोरे, सुरेश चौतमल, रमेश कोठुळे, राहुल घाडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली– अखील भारतीय मारवाडी महिला संमेलनाच्यावतीने कलकत्ता आणि बदलापूर येथील घटनेचा निषेध करीत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये महिला संमेलनाच्या पदाधिकारी तसेच शाळा, महाविद्यालयीन मुली मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. छाया– सुनील पाठक**

# सिंचन आणि वीज प्रश्नी आ. मुटकुळेंनी घेतली राज्यपालांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

जिल्ह्याचा सिंचन व विज अनुशेष प्रश्न बाबत आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी घेतली राज्यपाल सी.पी.राधाकृष्णनयांची नुकतीच भेट घेतली.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची सदिच्छा भेट घेतली. हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष २०१७ साली परभणी जिल्ह्यातून वेगळा करून मान्य करण्यात आला होता. त्या अनुषंगाने बऱ्याच प्रमाणात सिंचनाची कामे झाली परंतु बरीच कामे कर्मचाऱ्यांचा अभावामुळे बंद पडत आहेत. मोठ्या प्रमाणात रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी केली. त्यावेळी सोबतच सिंचन विहीरी २२००० करण्यासंदर्भात भूजल सर्वेक्षण कार्यालय पुणे यांनी अभिप्राय दिला होता. परंतु प्रत्यक्षात फक्त ५००० विहिरी पूर्ण झाल्या आहेत. त्याच बरोबर सिंचन वाढल्यामुळे विजेचाही तुटवडा भासत आहे. या विजेची अनेक केंद्रे मंजूर करून द्यावी, अशी मागणी यावेळी केली. यावेळी शहराध्यक्ष कैलासचंद काबरा, माजी नगरसेवक राजेश गोटे, हमीद प्यारेवाले उपस्थित होते.


## संक्षिप्त वृत्त

### जयपूर येथे पांदन रस्त्याचे भूमीपूजन



हिंगोली– सेनगाव तालुक्यातील जयपूर येथे पांदन रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन भाजपचे तालुकाध्यक्ष हिम्मत राठोड यांचे करण्यात आले. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधीतून या रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध झाला आहे. या रस्त्यामुळे गावातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी माजी जि प सदस्य विठ्ठल घोगरे, सरपंच संदीप पायघन, मंगला पायघन, संजय गुप्ता, तुळशीराम, राम पायघन, गणेश यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### राज्य राखीव दलात निवड झाल्याबद्दल सत्कार



औंढा नागनाथ– येथील राजीव गांधी उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मोहम्मद अल्ताफ अब्दुल लतीफ व खतीब ईकरामोद्दीन खयामुद्दीन या तरुणांची एस आर पी एफ हिंगोली येथे निवड झाल्याबद्दल तसेच जमादार खयामोद्दीन खतीब यांची ए एस आयपदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा राजीव गांधी विद्यालयाकडून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अब्दुल मन्नान तर प्रमुख पाहुणे म्हणून मोबीन अहमद खान, खतीब आलीमुद्दीन, सय्यद अफसर अन्सारी, अब्दुल मन्नान उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख ईद्रीसोद्दीन पठाण, खीजर अली खान इनामदार, सोहराबुद्दीन शेख रजाक, मोहम्मद मुजमील मोहम्मद हैदर, मोहम्मद शफीक मोहम्मद खलील, अहमद खान यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सिद्धी अब्दुल रशीद यांनी केले तर आभार प्रदर्शन काजी अफजलोद्दीन यांनी मानले.

### ५६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कार्यवाही

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कार्यवाही केली असून या वाहन चालकांकडून ३५ हजार ३५० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.

# अ.भा. मारवाडी महिला संघाकडून स्त्री सन्मान, स्त्री सुरक्षा रॅली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

कलकत्ता आणि बदलापूर येथील घटनेचा निषेध करीत अखिल भारतीय मारवडी सम्मेलनाच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्त्री सन्मान आणि स्त्री सुरक्षा रॅली काढली. यावेळी महिलांनी या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली. यावेळी शाखा अध्यक्ष अर्चना सोनी, प्रीति खंडेलवाल,सुनीता खंडेलवाल, डॉ सुवर्णा भन्साळी, दीपा भक्कड, किरण बजाज, रेखा लाठी, विजया अग्रवाल,कांचन मुंदडा, लता बालदी, सुनीता भन्साळी, आरती बाहेती, मनीषा व्यास, शारदा वर्मा, संगीता झंवर, विजया बाहेती राणी सारडा, सुनीता झंवर, सुनीता सारडा, गायत्री व्यास, पद्ममा सोमाणी, किरण खांडल, नेहा सोमाणी, पिल्ले बाई,नंदिनी सारडा, आस्था बाहेती, सीमा पारीक, पूजा वर्मा, निर्मला अग्रवाल, किरण झूनझूनवाला, राधा ठाकूर, अनुसया बांगर, स्वाती ठाकूर, मनीषा व्यास, अर्चना खंडेलवाल, किरण बडजाते, मीना झंवर, मोनिका झांजरी, श्रद्धा बगडीया, निकिता लादनीया, सरिता शर्मा, रेखा मानधनी, संगीता मणियार, स्मिता शर्मा, प्रीति सोनी, वंदना धुत, प्रीति झूनझूनवाला, छाया भुतडा, आरती लाहोटी, छाया लदनिया, दीपा झांजरी यांच्यासह शाळा महाविद्यालयीन मुलींनी सहभाग घेतला होता. यावेळी कलकत्ता आणि बदलापूर येथील घटनेचा जाहीर निषेध करीत या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी करण्यात आली.

# हिंगोलीत महिला पतंजली योग समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

महिला पतंजली योग समितीतर्फे हिंगोली जिल्ह्यात ९ जिल्ह्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी महिला पतंजली योग समिती महाराष्ट्राच्या वरिष्ठ राज्य प्रभारी सुधा अलिमोरे, महिला पतंजली योग समिती महाराष्ट्र पूर्वच्या राज्य प्रभारी संजीवनी माने, महामंत्री माया चव्हाण, राज्य कार्यकारिणी सदस्या प्रा.डॉ.माधुरी शास्त्री यांच्या मार्गदर्शनात ही बैठक घेण्यात आली.

सुधा अलिमोरे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, योग वर्गाची संख्या वाढली पाहिजे, योग शिबिर आयोजित केले पाहिजे, योग वर्गात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले पाहिजे. संघटनेचा विस्तार झाला पाहिजे. महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळत स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे प्रतिपादन केले. तसेच सर्व जिल्ह्याच्या योग कार्याचा आढावा घेतला. संजीवनी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की महिलांनी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. दररोज योग केला पाहिजे. योग केल्याने शारीरिक व मानसिक समस्या दूर होतात. ताणतणाव दूर होतात. सर्व योग शिक्षकांनी नियमित योग वर्ग घेतले पाहिजे. कार्यक्रमात सात जिल्ह्याचे जिल्हा प्रभारी हिंगोली, नांदेड, बुलढाणा, लातूर, अकोला, यवतमाळ, वाशिम येथील जिल्हा प्रभारी ,जिल्हा समिती पदाधिकारी, तहसील समिती पदाधिकारी व सर्व साधक उपस्थित होते. कार्यक्रमात कुंडीत जडीबुटीचे रोप लावून भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राजमती मुटकुळे, डॉ.निताताई बगडिया, प्रांत कार्यकारिणी सदस्य कुंडलिकराव निर्मले, संजय चाफळे, पतंजली योग समितीचे जिल्हा प्रभारी मन्मथ गुमठे, प्रा.अनिल शास्त्री उपस्थित होते.

राजमती मुटकुळे यांनी सांगितले की मी स्वतः योग शिकणार आहे, योग प्रचारासाठी हवी ती मदत करायला तयार आहे. भविष्यात योग कक्षा सुरू करण्याचा मानस आहे.

डॉ.निताताई बगडिया यांनी सांगितले की महिलांना आरोग्याच्या खूप समस्या असतात. वेगवेगळ्या योग वर्गात जाऊन महिलांच्याआरोग्यविषयक समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचा विचार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन महिला पतंजली योग समितीच्या जिल्हा प्रभारी ज्योती शेळके, महामंत्री शोभा धुमाळ, सोशल मीडिया प्रभारी जागृती गुरुनवाड, संवाद प्रभारी पुजा चौरसिया, तहसील प्रभारी अनिता चौंढेकर, तहसील संवाद प्रभारी वंदना दारवेकर, तहसील कोषाध्यक्ष लता अग्रवाल, तहसील संघटन मंत्री मिना सावके, तहसील कार्यकारिणी सदस्या सुनिता कवर, ज्योती घूमनार यांनी केले. औंढा तहसील प्रभारी अनिता जाधव, स्वाती, साधक यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. महिला खूप मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कल्पना जगताप, सविता जगताप, माधुरी बोरबळे, लक्ष्मी त-हाळ, प्रिती खंडेलवाल, राखी चौरसिया, कविता मदीलवार, सुषमा होकर्णे , राणी खिल्लारी यांनी सहकार्य केले. शितल तापडिया यांनी स्वागत गीत सादर केले.

ज्योती शेळके व जागृती गुरुनवाड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.माधुरीताई शास्त्री यांनी आभार मानले.

# सद्भावना दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २२ ऑगस्ट**

येथील तहसील कार्यालयात दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करीत सद्भावना दिवस शपथ घेऊन संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास तहसीलदार हरिष गाडे, नायब तहसीलदार लता लाखाडे, नायब तहसीलदार अनिता कोलगणे, नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव (निवडणूक), अव्वल कारकून श्रीकृष्ण दराडे, इम्रान पठाण, महसूल सहायक भास्कर खंदारे, संजय पाटील, उकंडी मार्कड, महेश हिवरे, शेख हमीद, नितीन कुलकर्णी, मल्हारी क्षीरसागर, नामदेव घोणे, वामन मोरे, कैलास जाधव, कार्यालयीन कर्मचारी हजर होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# डॉ.मीनलताईसह शिवराज पाटलांची भिस्त केवळ मनोज पाटील जरांगेंवरच!

**साहेबराव तुरेराव**
**उमरी,२२ ऑगस्ट -**

भारतीय जनता पक्षात असताना सुद्धा व नायगाव विधानसभा मतदारसंघात जातीपातीचे राजकारण न करता सर्वांचा विकास हाच ध्यास मनाशी बाळगून आमदार राजेश पवार यांनी विकास कामाच्या माध्यमातून जे अभेद्य असे सुरक्षा कवच निर्माण केलं त्याला केवळ मराठा जातीच्या समीकरणावर भेदल्या जाऊ शकतो असा गोड गैरसमज करून घेत माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर व माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या सुनबाई डॉ.मीनलताई खतगावकर यांनी येणाऱ्या विधानसभेचे गोड स्वप्न नायगाव विधानसभा मतदारसंघातून बघण्यास सुरुवात केले असून त्या पार्श्वभूमीवर मात्र त्यांची भिस्त केवळ मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटलावरच असल्याचे दिसुन येत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्तही अतिशय सजवलेली बॅनरं सोशल मीडियावर प्रसारित करीत सकल मराठा समाजाला भावनिक साद देत त्यांना विचलित करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला असला तरी नायगाव विधानसभा मतदारसंघातील मराठा मतदार त्यांच्या या कूटनीतीमुळे दक्ष झाल्याचे दिसुन येत आहे.

माजी सभापती शिवराज पाटलांचा इतिहास अख्ख्या नायगाव विधानसभा मतदारसंघातील नायगाव उमरी व धर्माबाद तालुक्यातील सुज्ञ जनतेला माहित आहे. त्यांची शिक्षण सभापती पदाची कारकीर्द लोकांनी अनुभवली असून शिक्षण क्षेत्रातील अनेक शिक्षकांना त्यांच्या कुटनीतीचा त्यावेळी घाव बसला आहे. त्याचे व्रण आज घडीलाही त्या कुटुंबीयांमध्ये आहे. या व्यतिरिक्तही त्यांचे व्यक्तिमत्व हे सर्वसामान्यांसाठी पारदर्शी राहिलेच नाही हे नायगाव मतदारसंघाला माहित आहे! त्याचप्रमाणे भास्करराव पाटील खतगावकर यांनी तर नायगाव विधानसभेसह देगलूर-बिलोली विधानसभेतील नागरिकांनाही कसे वेठीस धरले याची



प्रचिती लोक आज घडीलाही बोलून दाखवत आहेत. पुनर्वसित गावांच्या निधीची विल्हेवाट लावणे, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अक्षम्य घोटाळे करणे, साखर कारखाने बुडविणे आदी कामांच्या तक्रारी आहेत. माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी आपल्या सुनेला आमदार बनवायचा जणू चंगच बांधला असून त्या अनुषंगाने सुरक्षित मतदार संघ म्हणून त्यांनी पुन्हा एकदा नायगाव विधानसभा मतदारसंघाची निवड केली आहे. पहिल्या श्रावण सोमवारी मीनलताईंनी त्यांचे कुलदैवत असलेल्या संगम तीर्थक्षेत्राच्या महादेवाला साक्ष ठेवून प्रचाराचा नारळ जरी फोडला असला तरी त्यांची काळजात लपलेली जनतेबाबतची भूमिका केवळ निवडून येण्याचीच दिसुन येत आहे. मतदार संघातील विविध जातीचा त्यांच्या विविध समस्यांचा व विकासाचा विचार न करता केवळ नायगाव विधानसभेमधून मनोज जरांगे पाटील या मराठा आरक्षण योद्धाच्या माध्यमातून मराठा मतदारावरच निवडून येण्याचा एकमेव आधार असलेले गोड स्वप्न दोघेही उमेदवार पाहत असल्यामुळे त्यांच्या मागील कार्यप्रणालीची आमदार राजेश पवार यांच्या केवळ अडीच ते तीन वर्षाच्या कार्यप्रणालीशी तुलना करीत मराठा मतदार नायगाव विधानसभा मतदारसंघात मीनलताई व शिवराज पाटलांबद्दल अतिशय दक्ष झाला असून त्यांच्या भूमिकेबाबत कमालीचा संशय व्यक्त करीत त्यांना तोंडघशी पाडण्याचा संकल्प करीत आहे. या दोघांनीही मनोज जरांगे पाटलांची वैयक्तिक भेट घेतली व मतदार संघातील इतर सर्वच समीकरणे दुर्लक्षित केली.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आमदार राजेश पवार हे २०१९ साली निवडून आल्यानंतर दोन ते अडीच वर्षे केवळ कोरोना या वैश्विक महामारी मध्ये गेले. उर्वरित काळामध्ये कुठलेच जातीपातीचे समीकरण न करता सर्वांचा सर्वांगीण विकास ह्या ठोकताळ्यावरच आपला मतदारसंघातील विकास रथ शीघ्र गतीने ते आज घडीलाही पुढे नेत आहेत. याची मराठा मतदारांसह सर्वच धर्मीयात कबुलीसह त्यांच्या कार्याची उत्तम पोचपावती मिळत आहे. सर्वांचा, सर्व जातीचा सर्व समाजाचा विकास या ब्रीद वाक्यावर आमदार राजेश पवार यांनी ठाम राहत मुस्लिम व बौद्ध समाजाला त्यांच्या विकास कामासाठी निधी देण्यासही हयगय केली नाही. नुसतेच आश्वासन न देता त्यांनी त्याची पूर्तता शीघ्र गतीने केली व ती आज सर्वच मतदारसंघात सर्वधर्मीयात विकास कामाच्या रूपात दिसत आहे.

शिवराज पाटील होटाळकर व डॉ.मीनल ताई खतगावकर यांनी मराठा जातीपातीच्या दुष्ट समीकरणांच सुरक्षित व संरक्षित वलय निर्माण करण्याचा भास-आभास निर्माण करीत केवळ निवडून येण्याचं व नंतर जनतेला वाऱ्यावर सोडून वेठीस धरण्याचे स्वप्न ते पाहत असून आमदार राजेश पवारांचे विकासाचे सर्वच समाजात पसरलेले अभेद्य कवच तोडण्याचा केविलवाना प्रयत्नही दोघांकडून मतदार संघात विविध प्रयत्नांद्वारे सद्यस्थितीतही चालू असल्याचे सोशल मीडियावर सुज्ञ जनता पाहत आहे. हा समाजात एक प्रकारची फूट पाडण्याचा दुष्ट प्रयत्न असून यामुळे मात्र भविष्यात मतदार संघाचे अतोनात नुकसान संभावित असल्यामुळे त्यांच्या संदिग्ध व दुष्ट भूमिका लक्षात येत असल्यामुळे नायगाव विधानसभा मतदारसंघात मराठा मतदारांसह सर्वच धर्मातील मतदार अतिशय दक्ष झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# विद्युत खांबावर चमकले इलेक्ट्रिक राष्ट्रध्वज माहूरच्या नगराध्यक्षांची स्वप्न साकार

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,२२ ऑगस्ट -**

नगराध्यक्ष म्हणून सुरुवातीची अडीच वर्षे कार्यकाळ पूर्ण केल्यावर, माहूर नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदाची हॅट्रिक साधण्यासाठी दैवयोगाने मोलाची संधी मिळालेले विकासपुरुष,

सर्वधर्मसमभाव जोपासत दोन टर्म नगराध्यक्ष पदाचा कार्यकाळ सांभाळत शहरात विकासाची गंगा आणून आपला कार्यकाळ यशस्वीरित्या पूर्ण केलेले नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांच्या संकल्पनेतून स्वखर्चाने राष्ट्रीय महामार्गावरील ७० पेक्षा जास्त विद्युत खांबावर आकर्षक आणि मनमोहक असे चकाकणारे इलेक्ट्रिक राष्ट्रध्वज फडकविण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याने शहरवासी सर्वधर्मीय नागरिक तथा भाविक नगराध्यक्ष दोसानी यांचे सहर्ष अभिनंदन करताना दिसत आहेत.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली गेले दोन टर्म यशस्वीरित्या नगराध्यक्ष पदाचा कार्यकाळ पूर्ण करून देवयोगाने मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या आदेशाने पुढील अडीच वर्ष कायम नगराध्यक्ष राहण्याचा बहुमान मिळविलेले तसेच नगराध्यक्ष पदाची हॅट्रिक पूर्ण करण्याच्या मार्गावर विकास गंगे सोबत घोडदौड सुरू केलेले नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी माहूर शहराचा कायापालट करण्याचा मानस उराशी बाळगून माहूरच्या इतिहासात नोंद घेण्याजोगी अनेक विकास कामे पूर्णत्वास नेली असून नामदार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या स्वप्नातल्या माहूर शहरात वृक्षारोपणाची क्रांती घडवून आणण्यासाठी आग्रही असलेले फिरोज दोसानी यांनी माहूर शहरात जलक्रांती घडवीत नळ योजनेचे पाणी तळपत्या उन्हाळ्यात घरोघरी पोहोचवत पाणी टंचाईच जाणवू दिली नसल्याने तसेच माहूर शहरातील भोजंती तलावात पाणी साठवणूक करून कोट्यावधि रुपयाची विकास कामे सुरू करून माहूरच्या नावलौकिकात भर टाकल्याने आज शहरातील वी हीरी कुपनलिकांची पाणी पातळी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढविल्याने गेल्या उन्हाळ्यात माहुर वासी यांना अजिबात पाणीटंचाई जाणविली नसल्याने खरोखरचा विकास पुरुष म्हणून जनतेच्या मनातून त्यांनी शाबासकी मिळविलेली आहे



विकास करताना काही तरी वेगळे करून माहूर वासीयासह येणाऱ्या भाविकांना सर्व सुविधा मिळाव्या यासाठी नेहमी प्रयत्न करत असलेले नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी राष्ट्रभक्ती सर्वप्रथम मानत आपल्या समाजकार्याची सुरुवात केली होती गेल्या १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रध्वज फडकविण्याचे राहिल्याने त्यांनी माहूर शहरातून गडावर जाणाऱ्या विद्युत खांबावर इलेक्ट्रिक वायर द्वारे राष्ट्रध्वज चमकवीला परंतु राष्ट्रीय महामार्ग वरील विद्युत खांबांना विद्युत पुरवठा झाला नसल्याने दिनांक १७ रोजी सर्व खांबावर राष्ट्रध्वज चमकवून विद्युत पुरवठा सुरू होऊन पथदिव्यांच्या लखलखटात राष्ट्रध्वज खांबावर चमकत असल्याने त्यांनी स्वखर्चातून केलेल्या या उपक्रमाचे शहरवासीयासह परिक्रमा यात्रे निमित्त आलेले सर्व अधिकारी कर्मचारी आणि लाखो भाविक भक्तातून नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांच्या या अभिनव राष्ट्रभक्तीपर उपक्रमांचे अभिनंदन करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त




### जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेत विठ्ठल जिल्ह्यात दुसरा

**मुखेड** -जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेत विठ्ठल नामदेव यलकटवार ह्याने १७ वर्ष वयोगटात जिल्हात दुसरा क्रमांक पटकाविला. त्याच्या या कामगिरीमुळे त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. नांदेड येथे दि.०७ व ०८ ऑगस्ट २०२४ रोजी क्रिडा व युवक सेवा संचालनालय,पुणे व जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने असर्जन चौक विष्णुपुरी परिसरात पार पडलेल्या १० कि.मी.च्या स्पर्धेत मुखेडचा विठ्ठल नामदेव यलकटवार ह्या विद्यार्थ्याने नांदेड जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. हे अंतर त्याने १ तास,३ मिनिटं आणि ६ सेकंदात पूर्ण केले. परतीच्या प्रवासात रस्ता चुकल्याने, काही वेळ वाया गेल्याची खंत त्याने बोलताना व्यक्त केली. या स्पर्धेची माहिती प्रशिक्षक विजय राठोड यांनी देऊन सरावासाठी मार्गदर्शन करून रजिस्ट्रेशन केले होते. विठ्ठल हा मुखेड येथील रहिवासी आहे. तर द ब्राईट स्टार इंग्लिश स्कूल, उमरदरी येथे तो इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे. तो शाळा सुटल्यावर आपला अभ्यास पूर्ण करूनही तो दहा किमी सायकलिंगचा सराव नेमाने करायचा. शिक्षण व सायकलिंग चा सराव ही तारेवरची कसरत करताना काही वेळा सराव चुकतोही पण माझी जिद्द आहे की सायकलिंग मध्ये राज्यात नाव मिळवायची हे यश माझ्या मार्गदर्शकांना जाते. त्यांच्याकडून मला मोलाचे मार्गदर्शन मिळाले. यामुळे त्याची दखल घेऊन तहसीलदार राजेश जाधव यांनी विठ्ठलला बोलावून त्याचा सत्कार व कौतुकीची थाप दिली. यावेळी पेशकार मुधोळकर, प्रशिक्षक विजय राठोड, नामदेव यलकटवार उपस्थित होते.

### ज्येष्ठ पत्रकार संजय कदम पुरस्कार जाहीर

**भोकर**- गेल्या सोळा वर्षापासून अगदी तटस्थ राहून वास्तववादी रोखठोक पत्रकारिता करणारे धर्माबादचे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना यावर्षी पत्रकारितेत उत्कृष्ट कार्य केल्याबाबत महात्मा कबीर समता परिषद या मानांकित संस्थेचा महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार संजय निवडंगे यांच्या युग कवी वामनदादा कर्डक व प्रतापसिंग बोदगे या प्रतिवर्षी होणाऱ्या जयंती सोहळ्यातील 'तुफानातील दिवे'हा अतिशय प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार संजय कदम यांना जाहीर झाला आहे.

# आ.भिमराव केराम यांच्या हस्ते ईस्लापूर येथे विविध विकास कांमंचे भुमीपुजन

**तभा वृत्तसेवा**
**ईस्लापूर,२२ ऑगस्ट -**

ईस्लापूर येथे आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते विविध कामाचे उद्घाटन सोहळा संपन्न झाला. ईस्लापूर शहराला विकासात्मक दृष्टिकोनातून शहराला विकासाची चालना मिळावी स्वच्छ शहर, सुंदर शहर करण्यासाठी आ.भिमराव केराम यांच्या हस्ते ईस्लापूर येथे विविध विकास कामाचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा झाला.

साठे नगर येथे ५० लाख रुपयांचे समाज मंदिर कामाचे भूमिपूजन, बौद्ध विहार ४० लाख रुपये समाज मंदिराच्या कामाचे भूमिपूजन, इच्छापूर्ती गणेश मंदिर येथे १५ लाख रुपये सि.सि. कामाचे लोकार्पण, शिवाजीनगर येथे १० लाख



रुपये कामाचे लोकार्पण, फॉरेस्ट नाका कल्याण दुकानापासून सीसी ९ लाख रुपये कामाचे लोकार्पण,नळकांडी फुल जिल्हा परिषद शाळा कडे जाणारा कामाचे भूमिपूजन पार पडले. साई मंदिर येथे सर्व कार्यकर्त्यांची बैठक होऊन आमदार भीमराव केराम यांचा गावकऱ्यांनी शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी किनवट विधानसभा प्रमुख बाबूराव केंद्रे, नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, उदय पाटील, कपील करेवाड, भाजपचे जिल्हा सचिव काशिनाथ शिंदे, मारोती लोखंडे, गोविंद अंकुरवाड, शांताबाई दासरवाड, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस विकास मारोती माहूरकर, दिलीप तुमलवाड, संदिप पानपट्टे, तुकाराम बोनगीर, पांडुरंग जाधव, प्रकाश दंडे, विठ्ठल गटपाळे, राजू अंबटवाड, प्रकाश पाटील, सुर्यनारायण पाटील, सुर्यकांत बोधनकर, नारायण शिनगारे, देविदास पळसपुरे, संभाजी पाटील, विजय तोटावाड, राजु गटपाळे, शेख लतीप, शिवशंकर मुंडे, रवी कसबे, प्रमेश्वर पेशवे, ईश्वर जाधव, व परिसरातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालत

**मुखेड** - महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यातर्फे दिनांक २८ सप्टेंबर रोजी जिल्हा न्यायालय नांदेड व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात तसेच कौटुंबीक न्यायालय नांदेड येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीत मोठ्या संख्येने प्रकरणात तडजोड होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा कोसमकर व न्यायाधीश नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव दलजीत कौर जज यांनी केले आहे.



**नायगाव - नांदेड जिल्ह्याचे खासदार वसंतराव पाटील चव्हाण यांची तब्येत ठीक नसल्याने पुढील उपचारासाठी हैद्राबाद येथे दाखल केल्यानंतर आज दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ओड समाजाचे नेते नंदकिशोर टोकलवाड यांनी हैद्राबाद येथे रविन्द्र पाटील चव्हाण व आनंद पाटील चव्हाण यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली असता तब्येतीत सुधारणा होत असल्याचे सांगितले. यावेळी पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल, सय्यद इसाक भाई, माजी उपसरपंच नजीर बागवान, ग्राम पंचायत सदस्य नजीर शेख, सय्यद मोसिन उपस्थित होते.**

# कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान व धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांकडे फिरविली पाठ



**तभा वृत्तसेवा**
**सोनखड,२२ ऑगस्ट -**

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान व राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी २१ ऑगस्ट रोजी नांदेडहून परळी वैजनाथ येथे जाताना होटलवाडी येथील शेतकऱ्याकडे पाठ फिरविल्याने शेतकरी नाराज झाल्याचे दिसुन आले.

देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान व राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे हे परळी येथे दुपारी तीन वाजता स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे सभा मंडप कॉटन मार्केट यार्ड नाथ रोड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव या कार्यक्रमासाठी नांदेडहून परळीकडे जात असताना वाटेतच असलेल्या होटलवाडी शिवारात येथील महिला शेतकरी सौ.शोभाबाई त्र्यंबकराव हुस्सेकर या महिलेला सन २०२१-२२ नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये पोकरा योजने अंतर्गत त्यांना दोन लक्ष पन्नास हजार रुपये किमतीची अनुदानित विहीर मिळाली होती. त्या विहिरीची व कापसाच्या पिकावरील कीड रोगाची पाहणी करण्यासाठी मंत्री महोदय येणार आहेत असा शासकीय प्रोटोकॉल सहित तालुका कृषी कार्यालय लोहाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अशी माहिती तालुका कृषी अधिकारी पोटपलवार यांनी दिल्यानंतर शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पीक पाहणी पोर्टल वरील नोंदीत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देण्यात यावे या मागणीचे निवेदन देण्यासाठी सोनखेड,आंबेसांगवी,शेलगाव, होटलवाडी या भागातील शेतकऱ्यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान व राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे आपल्या व्यथा मांडता येतील या उदांत हेतूने बहुसंख्य शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली होती. तर दुसरीकडे मंत्री महोदय येणाऱ्या धास्तीने प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपविभागीय अधिकारी कंधार (महसूल), उपविभागीय अधिकारी कंधार(गृह) तहसीलदार विठ्ठल परळीकर लोहा तालुका कृषी अधिकारी लोहा व पोलीस प्रशासनाचा मोठा फौज फाटा या सहित श्वान पथक देखील या शिवारात दाखल झाले होते. परंतु देशाचे व राज्याचे कृषिमंत्री पद भूषविणाऱ्या कृषी मंत्र्यांनी थेट शेतकऱ्याकडेच पाठ फिरविल्यामुळे कास्तकार वर्गामध्ये एक नाराजीचा सूर पाहायला मिळाला तर कृषी महसूल व गृह विभागाचा देखील वेळ वाया गेल्याचे लक्षात आले. विशेष म्हणजे कृषी मंत्र्यासाठी आणलेले महाग पुष्पगुछ अखेर शेतकऱ्यांनी एसडीएम, तहसीलदार, कृषी अधिकारी यांना भेट देऊन समाधान मानावे लागले.

## शहीद सुधाकर शिंदे यांच्या स्मृति दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थी व महिला पोलीस पाटलांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२२ ऑगस्ट -**

छत्तीसगड येथे नक्षली हल्लयात आपल्या प्राणाची आहुती देणारे शहीद सुधाकर शिंदे यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थी आणि नवनिर्वाचित महिला पोलीस पाटिल यांचा सन्मान करण्यात आला. शहीद सुधाकर शिंदे यांना २० ऑगस्ट २०२१ रोजी छत्तीसगढ येथील नारायणपूर जिल्ह्यात नक्षली हल्लयामध्ये वीरगती प्राप्त झाली होती. आज त्यांच्या तृतीय स्मृतीदिन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणुन मुखेडचे तहसीलदार राजेश जाधव, प्रमुख मार्गदर्शक म्हणुन आयटीबीपीचे असिस्टंट कमांडंट प्रवीण नारंजे, पोलीस उपनिरीक्षक सय्यद पठाण, अमर पाफळ ,हंसराज पाटिल, आयटीबीपीचे पोलीस उपनिरीक्षक लुद्दर, आयटीबीपीचे पोलीस कॉन्स्टेबल योगेश देवरे, वीरपत्नी सुधा सुधाकर शिंदे, पिता राजेंद्र शिंदे, सरपंच शेख मन्नूसाब यांच्यासह माजी सैनीक कायंदे ,डुमने बालाजी जाधव ,सुधाकर घोडके , लालबा पिल्लेवाड , मारोती विनेवाड ,राजु पवार ,शामराव राठोड यांच्यासह बामणी गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# वानरे मस्त, गावकरी त्रस्त तर वन विभाग सुस्त

**तभा वृत्तसेवा**
**निवघा बाजार,२२ ऑगस्ट -**

परीसरातील तळणीत मागच्या दोन वर्षापासून वानरांनी गावात येऊन हैदोस घातलेला आहे. याबाबत गावातील गावकऱ्यांनी आणि ग्रामपंचायतींनी सुद्धा वन विभागाला वेळोवेळी सूचित करून या वानरांच्या त्रासापासून गावकऱ्यांची सुटका करावी याबाबत कळविले होते. यानुसार वन विभागाची एक टीम दोन पिंजरे घेऊन तळणीमध्ये आली परंतु त्यांच्या हाती काही लागले नाही.



वन विभागाने हे पिंजरे तसेच ग्रामपंचायतीच्या आवारात ठेवले. परंतु वन विभागाचा एकही कर्मचारी त्यानंतर वानरे पकडण्यासाठी गावात आला नाही. पिंजरे मात्र परस्पर घेऊन गेले. सध्या तरी या वानरांना पकडून त्यांना सुरक्षित स्थानी स्थलांतरित करण्याचा विषय वन विभागाकडून थंड बस्त्यात टाकण्यात आलेला आहे. असे असले तरी वानरांनी मात्र जून-जुलै ओलांडून गेला तरी आपला मुक्काम गावातून मात्र हलवलेला नाही. ते अजूनही गावात ठाण मांडून बसले आहेत. कोणाच्या घरच्या भाकरी उचलणे, लहान मुलांच्या अंगावर जाणे, स्त्रियांच्या अंगावर धावून जाणे आदी त्यांचे उपद्व्याप अद्याप चालूच आहेत. त्यामुळे सगळे गाव त्रस्त असल्याने वन विभागाने तातडीने हालचाली कराव्यात अशी मागणी होत आहे.

# श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था हतराळच्या नुतन कार्यकारिणी निवडीस धर्मदाय उपायुक्तांची मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,२२ ऑगस्ट -**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था हातराळ ता मुखेड जिल्हा नांदेड या संस्थेचे इ.स.२०२४ पूर्वीचे अर्ज धर्मदाय उपायुक्त नांदेड यांनी नामंजूर केलेले असल्याने इ.स. २०२४ ते २९ व्या पंचवार्षिक कालावधीसाठी निवडणूक घेण्यात चे धर्मदाय न्यायलयाने परवानगी देऊन ड.केशव हणमंते यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती व त्यांना संस्थेच्या वैद्य व कायदेशीर सभासदांमध्ये निवडणूक घेण्याचे निर्देशित केले होते.

सदरील निवडणुकीत संस्थेचे मावळते सचिव संभाजी बिरादार यांनी अभिजित संभाजी बिरादार (मुलगा) व सौ.शशिकला संभाजी बिरादार (पत्नी) या दोन बेकायदेशीर सभासदासह बेकायदेशीर ठिकाणी निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाल्याने संस्था अध्यक्ष वेंकटराव टेंभुर्णी यांनी त्यास आक्षेप नोंदवून निवडणूक प्रक्रिया काही कालावधीसाठी तहकूब केली. व नंतरच्या सभेची वेळ कळवून तहकुबीनंतर सभेस वैद्य व कायदेशीर सभासदांनाच वैद्य ठिकाणी निवडणुकीत सहभागी होण्याचे सांगितले दरम्यान च्या काळात निवडणूक अधिकारी ड. केशव हणमंते यांच्याकडून वैद्य व कायदेशीर सभासदांची यादी जाहीर करणे कायदेशीर रित्या बंधनकारक असून ही त्यांनी तसे केले नाही. तहकुबीनंतर दिनांक २० जुलै २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता सर्वसाधारण सभा पुन्हा सुरू झाली व त्यात निवडणूक अधिकारी ड.केशव हणमंते तसेच मावळते सचिव संभाजी बिरादार यांनी अनुपस्थिती नोंदवली. त्यामुळे अध्यक्ष व्यंकटराव टेंभुर्णी यांनी एकूण वैद्य चार सभासदा पैकी तीन सभासद १) व्यंकटराव टेंभुर्णी २) सौ. निलावती टेंभुर्णी ३) तुलसीदास टेंभुर्णी उपस्थित राहिल्यामुळे संस्थेचे कोरम पूर्ण होताच नियमाप्रमाणे कार्यकारी मंडळ निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली. खालील प्रमाणे कार्यकारणी मंडळ इ. सन २०२४ ते २९ करिता अस्तित्वात असल्याचे मा. धर्मदाय उपायुक्त यांना बदल अर्जाद्वारे कळवले. व त्यांना न्यायालयाने त्याचा बदल मंजूर केला आहे. त्यामुळे नवनिर्वाचित कार्यकारी मंडळांची यादी जाहीर करण्यात आली. तर तसेच संभाजी बिरादार हे गेले ३० वर्षे प्रदीर्घ सचिव पदावर कार्यरत असल्यामुळे काही शासकीय घडामोडीत अर्थ निर्माण करून शिक्षकावर दमदाटी करायचे असेही सदरील पत्रात लिहिले आहेत. सदरील निवडणुकीच्या माध्यमातून त्यांचा पराभव झाल्यामुळे सर्व संस्था संस्थेअंतर्गत कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे नवनिर्वाचित कार्यकारी मंडळ खालील प्रमाणे येत्या पंचवार्षिक योजना २०२४ ते २९ करिता संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव गंगाधर टेंभुर्णी, सचिव तुळसीदास व्यंकटराव टेंभुर्णी, कोषाध्यक्ष सौ.निलावती व्यंकटराव टेंभुर्णे यांची निवड वडीस मा. धर्मदाय आयुक्त यांनी निवडीचे आदेश देऊन शिक्का मोर्तब करण्यात आला आहे.